# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत सिडको, एमआयडीसी व शासनाच्या जागेवर असणाऱ्या झोपडपट्ट्यांचा विकास करण्याबाबत**

**(१) २८९ (२०-०३-२०२०). श्री.गणेश नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाने सन २०११ पर्यंत उभ्या राहिलेल्या झोपड्यांना संरक्षण देत त्यांना पक्की घरे देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिका हद्दीत सिडको, एमआयडीसी व शासनाच्या जागेवर असणाऱ्या झोपडपट्ट्यांचा विकास करण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने संबंधित यंत्रणासह शासनाकडे जागेची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित यंत्रणांकडे व शासनस्तरावर महानगरपालिका सातत्याने पत्रव्यवहार करून देखील कोणताच प्रतिसाद मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर झोपड्यांचा पुनर्विकास करण्याबाबत शासनस्तरावरून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (२४-०२-२०२२) :** (१) शासन निर्णय क्रमांक-झोपुधो-०८१०/प्र.क्र.९६/२०१८/झोपसु-१, दि. १६/५/२०१८ नुसार दि.०१/०१/२००० ते दि. ०१/०१/२०११ पर्यंतच्या झोपडीत प्रत्यक्ष अहवालाचा झोपडीधारकांचे सशुल्क पुनर्वसन केले जाणार आहे.

(२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) गृहनिर्माण विभाग, अधिसूचनाक्र.एमएमआर-२०२०/प्र.क्र.५६/२०२०/झोपसू दि.८/९/२०२० अन्वये "मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामध्ये (बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्र वगळून)" ८ महानगरपालिका व ७ नगरपालिका/नगरपरिषद यांचा समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिकेचा समावेश करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पंढरपूर येथील शेतातून जाणाऱ्या वीज वितरण कंपनीच्या उच्च दाबाच्या वीज वाहक तारा लोंबकळत असल्याबाबत**

**(२) ४०४० (१०-०४-२०२०). श्री.राम सातपुते (माळशिरस) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर येथील शेतातून जाणाऱ्या वीज वितरण कंपनीच्या उच्च दाबाच्या वीज वाहक तारा कमी उंचीवर लोंबकळत असल्याने स्पार्किंग होऊन शेतकऱ्यांच्या ऊस शेतीला धोका निर्माण झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना तोंडी व लेखी कळवून सुध्दा त्यांच्या तक्रारीकडे जाणून बुजून दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे खरे आहे काय?

(३) असल्यास, उसाची उंची तब्बल १५ फुटांपर्यंत वाढली असून तर वीज वाहक तारांची उंची दहा फुटांपर्यंत आहे, त्यामुळे वीजप्रवाह उसाच्या पिकात उतरत असल्याने सौम्य करंट बसत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन लोंबकळत असलेल्या वीज तारा दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय?

**डॉ. नितिन राऊत (१२-१०-२०२१) :** (१) हे अशंत: खरे आहे.

उच्च दाब विद्युत वाहिन्या कमी उंचीवर लोंबकळत असल्याचे आढळल्यास अथवा स्पार्किंग होण्याची शक्यता असल्यास अशा ठिकाणची दुरुस्तीची कामे एम्पॅनलमेंट निविदांद्वारे ठेकेदाराची नियुक्ती करुन करण्यात येत आहेत.

(२) हे खरे नाही. तोंडी अथवा लेखी तक्रारी प्राप्त झाल्यास त्यावर योग्य ती नियमोचित कार्यवाही करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) पंढरपूर तालुक्यातील विद्युत वाहिन्यांचे प्रतिबंधनात्मक देखभाल व दुरुस्ती (Preventive maintenance) करण्यासाठी तसेच विद्युत वाहिन्यांचे ब्रेकडाऊन मेन्टेनन्ससाठी पुढील ३ वर्षाकरीता प्रत्येकी ३ कंत्राटदारांना एम्पॅनलमेंट निविदांद्वारे कामाचे आदेश देण्यात आले आहेत. विद्युत वाहिन्यांचे प्रतिबंधात्मक देखभाल व दुरूस्तीच्या आदेशाअंतर्गत रु.२.८० लाख कामाचे १० कर्यादेश देण्यात आले आहेत. तसेच विद्युत वाहिन्यांतील तातडीचे बिघाड दुरुस्तीच्या आदेशाअंतर्गत रु.१२.४५ लाख एवढया रकमेच्या कामाचे १५ कार्यादेश देण्यात आले आहेत. त्याअंतर्गत ११ ठिकाणी ९४ उच्चदाब वाहिनीचे गाळे काढून ओढून गाळयांची उंची वाढविण्यात आली आहे. तसेच लघुदाब वाहिनीच्या तारांचा एकमेकांना स्पर्श होऊन स्पार्किंग होऊ नये याकरिता अपघात प्रवण क्षेत्रात पिक जळीत प्रकरणे टाळण्यासाठी स्पेसर्स बसविण्याचे कार्यादेश देण्यात आले असून त्याअंतर्गत पंढरपूर तालुक्यामध्ये लघुदाब वाहिनीवर ४९५६ स्पेसर्स बसविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या सर्वेक्षणानंतर १८ इमारती अतिधोकादायक जाहिर केल्याबाबत

**(३) ११४४९ (१७-०९-२०२०). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जवळपास १६ हजार उपकरप्राप्त इमारती असून त्यापैकी ९० टक्के इमारती या मोडकळीस आल्या असून धोकादायक अवस्थेत असल्याचे माहे जून, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या सर्वेक्षणानंतर मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने दिनांक ११ जून, २०२० रोजी वा त्या सुमारास १८ इमारती अतिधोकादायक असल्याचे जाहीर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, म्हाडाच्या सर्वेक्षणानुसार अतिधोकादायक इमारतींमध्ये ३१७ निवासी, २२३ अनिवासी भाडेकरूंचा समावेश असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार जुन्या व मोडकळीस आलेल्या धोकादायक इमारतीमधील रहिवाशांचे जीवन व मालमत्ता सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०५-०१-२०२२) :** (१) व (२) मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळाच्या प्राप्त अहवालानुसार, मुंबईतील उपकरप्राप्त इमारतीचे सर्वेक्षण सन २०२० मध्ये केले होते. त्यामध्ये एकूण १८ उपकरप्राप्त इमारती अतिधोकादायक आढळलेल्या आहेत.

(३) होय, हे खरे आहे

(४) धोकादायक भागात राहणाऱ्या ३१७ निवासी भाडेकरु/रहिवाश्यांना त्यांच्या जागा खाली करुन घेण्यात आलेल्या आहेत. आवश्यकतेनुसार धोकादायक भाग पाडणे व इमारतींची संरचनात्मक दुरुस्ती करण्याची कार्यवाही मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई शहर व उपनगरातील म्हाडाच्या निवासी इमारती व अनिवासी गाळयांचे दुरूस्तीबाबत

**(४) १२४३५ (१९-०९-२०२०). श्री.रविंद्र वायकर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात मोठ्या प्रमाणात म्हाडाच्या निवासी इमारती व अनिवासी गाळे आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवासी इमारती व अनिवासी गाळे हे अत्यंत धोकादायक असल्याने या इमारतींच्या व गाळयांच्या दुरूस्तीबाबत स्थानिक प्रशासनाने अनेक वेळा सूचनापत्रे जारी केली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या इमारतींच्या व गाळयांच्या दुरूस्तीकरिता आवश्यक निधी उपलब्ध न झाल्याने या इमारती व गाळयांची आजवर दुरूस्ती होवू शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या इमारतींची दुरुस्ती अथवा पुनर्विकास शासनाच्या माध्यमातून करण्याबाबत तत्कालीन पालकमंत्री यांनी माहे ऑक्टोबर, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान तत्कालीन मा. मुख्यमंत्री यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक घेवून या इमारती व गाळयांच्या विकासासंदर्भात निर्णय घेतले होते, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, सदरहू बैठकीत या इमारतींच्या व गाळयांच्या विकासाबाबत कोणकोणते निर्णय घेण्यात आले होते व सदरहू निर्णयांपैकी कोणकोणत्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यात आली व कोणकोणत्या निर्णयांची अंमलबजावणी अद्याप करण्यात आलेली नाही,
(६) असल्यास, म्हाडा वसाहतीत राहणाऱ्या सदनिकाधारकांना सुरक्षित व दर्जेदार सदनिका उपलब्ध करून देण्याबाबत शासन सकारात्मक भूमिका घेणार आहे काय, याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०७-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई मध्ये म्हाडाच्या ५६ वसाहतींचे बांधकाम सन १९७६ च्या दरम्यान करण्यात आलेले आहे. या वसाहतीमधील गाळ्यांचे वाटप हे विविध प्रवर्गातील लोकांना करण्यात आलेले आहे.

या विविध प्रवर्गातील लोकांनी एकत्र येऊन सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या आहेत.

सदरहू संस्थांचे अभिहस्तांतरण झाल्यामुळे इमारतींची देखभाल व दुरुस्ती ही संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थांमार्फतच करण्यात येते.

(४) अशा प्रकारची बैठक घेतल्याचे अभिलेख आढळून येत नाहीत.

(५), ते (७) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागरी जमीन कमाल धारणा कायदा सन २००७ मध्ये रद्द झाल्यानंतर शासनाने या अंतर्गत असलेले भूखंड ताब्यात घेण्याबाबत**

**(५) १४७८२ (१७-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागरी जमीन कमाल धारणा कायदा सन २००७ मध्ये रद्द झाल्यानंतर शासनाने या अंतर्गत असलेले भूखंड ताब्यात घेणे आवश्यक होते परंतु तसे करण्यात न आल्याने हे भूखंड कॉर्पोरेट कंपन्या वा विकासकांकडे असून सदर भूखंडांच्या वापरातून राज्यात साडेआठ हजार सदनिका तयार होणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू भूखंड शासनाने ताब्यात न घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, सदरहू साडेआठ हजार सदनिका ताब्यात घेण्याबाबत शासन कोणती कार्यवाही करणार वा करीत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-०१-२०२२) :** (१), (२) व (३) राज्य शासनाने नाजकधा निरसन अधिनियम, १९९९ हा दि.२९.११.२००७ रोजी स्विकारला असून उक्त अधिनियमानुसार कलम २० अन्वये मंजुर केलेल्या योजना व कलम १०(३)/१०(५) नुसार ताब्यात घेतलेल्या जमिनींना संरक्षण प्राप्त आहे.

परंतु, नाजकधा निरसन अधिनियमानुसार कलम २० च्या वैधतेबाबत महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसींग इंडस्ट्रीज व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेसमोर रिट याचिका क्र.९८७२/२०१० दाखल केली होती. उक्त याचिकेमध्ये मा.न्यायालयाने कलम २० खालील योजनेच्या अटी व शर्ती योजनाधारकांवर बंधनकारक असल्याचा दिलेला निर्णय, विशेष अनुमती याचिका क्र.२९००६/२०१४ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयात आव्हानित झाला होता. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.१०.११.२०१४ रोजी योजनाधारकांवर कोणताही प्रतिकूल परिणाम होईल, अशी कारवाई (Coercive action) करु नये असे आदेश दिले होते. मा. न्यायालयाच्या उक्त आदेशाच्या पार्श्वभूमीवर योजनाधारकाकडून योजनेखालील क्षेत्रांचा विकास होत नव्हता.

त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी राज्य शासनास शिफारस करण्यासाठी शासन निर्णय दि.०२.७.२०१९ अन्वये द्विसदस्यीय समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने दिलेला अहवाल, त्याबाबतची शासनाची भुमिका व Consent Terms मा. सर्वोच्च न्यायालयासमोर सिव्हील ॲप्लीकेशनद्वारे दाखल करण्यात आली. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि.०२.०७.२०१९ रोजी व्दिसदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाही करण्यास अनुमती दिल्याने शासन निर्णय दि.०१.८.२०१९ नुसार नाजकधा कलम २० खालील योजनांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आलेला आहे. त्यानुसार अधिमूल्याचा भरणा करुन योजनेखालील क्षेत्र रहिवास प्रयोजनार्थ विकासास अनुज्ञेय केलेले असून कमी आकारमानाच्या सदनिका ठेवण्याचे बंधन घालून गृहबांधणीस प्रोत्साहन दिलेले आहे. ज्या विकासकांना कलम २० च्या अटी / शर्तीनुसार योजना पुर्ण करावयाची असेल तर सदर विकासकांना त्यानुसार योजना पूर्णत्वास नेणेस प्रत्यवाय नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मुंबईतील सर्व पुलांची तपासणी करण्याबाबत

**(६) १४८४५ (१९-०९-२०२०). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिमालय पूल दुर्घटनेप्रकरणी पोलिसांनी सहाय्यक अभियंता श्री.काळकुते व कार्यकारी अभियंता श्री.अनिल पाटील यांना अटक केल्यानंतर या दोघांनी कोणत्याच पुलाची तपासणी केली नसल्याची धक्कादायक महिती निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती मुंबईतील सर्व पुलांची तपासणी करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-१२-२०२१) :** (१) सीएसएमटी हिमालय हाऊस ते टाईम्स ऑफ इंडिया बिल्डींगला डी.एन. रोडवर जोडणारा पादचारी पुलाची सहायक अभियंता श्री. काळकुते व कार्यकारी अभियंता श्री. अनिल पाटील यांनी तपासणी केली नसल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे असे गृह विभागाने कळविले आहे.
(२) सीएसटी पादचारी पूल दुर्घटनेबाबतची चौकशी करण्यासाठी दिनांक २७ मार्च, २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये अ.मु.स./सा.बां. यांचे अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या उच्च स्तरीय समितीने तयार केलेला चौकशी अहवाल दिनांक २०.०७.२०१९ रोजीच्या गोपनीय पत्राद्वारे मुख्यमंत्री सचिवालयास सादर करण्यात आला असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील शहर विभागातील पुलांची पुनर्सरचनात्मक तपासणी करण्यासाठी नवीन संरचनात्मक परिक्षकांची नेमणूक करण्यात आली असून, उपनगरातील पुलांची संरचनात्मक पुनर्तपासणी पूर्वीच्याच संरचनात्मक परिक्षकांकडून करुन घेण्यात आली आहे.

प्राप्त संरचनात्मक तपासणी अहवालानुसार पुलांच्या दुरुस्तीची कामे महानगरपालिकेमार्फत सुरु करण्यात आले असून, सदर कामे प्रगतीपथावर आहेत असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## ठाणे मधील वर्तकनगर येथील म्हाडाच्या वसाहतींच्या पुनर्विकासामध्ये मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहाराबाबत

**(७) १६८१९ (२१-११-२०२०). श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे मधील वर्तकनगर येथील म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासासाठी परिशिष्ट आर नुसार १५ टक्के प्रोत्साहनपर (इंसेंटिव्ह) एफएसआय देता येणार नसतानाही सुमारे ७० हजार चौरस फुटांच्या अतिरिक्त एफएसआय विकासकाला म्हाडा आणि महानगरपालिकेने दिल्याचे माहे सप्टेंबर, २०२० मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक १२ डिसेंबर, २०१८ रोजी वा त्या सुमारास राज्य शासनाच्या नगरविकास विभागाने ठाणे महानगरपालिकेला पत्र पाठवून म्हाडा इमारतींसाठी हा प्रोत्साहनपर एफएसआय अनुज्ञेय नसल्याचे स्पष्ट केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नंतर प्रो-राटा (pro-rata fsi) एफएसआयचे सुधारित गणित मांडून हे अतिरिक्त बांधकाम नियमित करण्यात आले असून विकासकाला कोट्यवधी रुपयांचा फायदा मिळवून देणारे धोरण आखण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासन विशेष समितीमार्फत चौकशी करणार आहे काय, चौकशीनूसार विकासकाला अतिरिक्त लाभ मिळवून देणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०३-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही

विनिमय १६५ - "R" मधील तरतूदीनुसार १५ % अतिरिक्त चटईक्षेत्र हे अभिन्यासातील क्षेत्राव्यतिरीक्त चटईक्षेत्र असून सदर क्षेत्र वितरणाकरीता वर्तकनगर, ठाणे येथील अभिन्यासातील प्राप्त अर्जदार संस्थाच्या मागणीनुसार वितरणाबाबत संपुर्ण कार्यवाही म्हाडा प्राधिकरण धोरणानुसार करण्यात आलेली होती.

त्यानंतर वर्तकनगर, ठाणे या म्हाडा अभिन्यासात २.५ च.क्षे.नि. व्यतिरीक्त विनियम १६५-"R" मधील तरतूदीनुसार १५ % अतिरिक्त चटईक्षेत्र अनुज्ञेय करता येणार नाही असे निर्देश शासनाच्या नगर विकास विभागाने दि.१२.१२.२०१८ रोजी ठाणे महानगरपालिकेला कळविलेले होते. सदर पत्राची प्रत म्हाडास अवगत करण्यात आली नव्हती. त्यानंतर ठाणे महानगरपालिकेने दि.०८.०५.२०१९ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त निर्देशाबाबत माहिती कोंकण मंडळास कळविलेली आहे.

तथापि, सदर विनियम १६५-"R" चे क्षेत्र वितरणाबाबत जुलै २०१८ नंतर वर्तकनगर, ठाणे या म्हाडा अभिन्यासातील एकाही अर्जदार संस्थेला ना-हरकत पत्र देण्यात आलेले नाही, असे कोंकण मंडळाने कळविले आहे.

(४) उपरोक्त मुद्दा क्र.३ प्रमाणे कार्यवाही झालेली असल्याने कोणतीही कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## म्हाडा प्राधिकरणातील कार्यकारी अभियंता व त्यांचे सहकारी यांनी आपल्या अधिकाराचा दुरूपयोग करून २५ कोटी रूपयांचा गैरव्यवहार केल्याबाबत

**(८) २०३०७ (०६-०९-२०२१). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) म्हाडा प्राधिकरणातील कार्यकारी अभियंता ई-२, एस.आर.सी.आर/एस.सी पदावर कार्यरत असलेले श्री.संजय जाधव व त्यांचे सहकारी यांनी आपल्या अधिकाराचा दुरूपयोग करून २५ कोटी रूपयांचा गैरव्यवहार केल्याची बाब सन २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गैरव्यवहाराप्रकरणी तपासणी व चौकशी करून त्याबाबतचा अहवाल १५ दिवसात सादर करण्याबाबत उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, प्राधिकरण यांनी श्री.अशोक काकडे, मुख्य अधिकारी, पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, पुणे व श्री.के.एल.करवते, कार्यकारी अभियंता, दवगुनी कक्ष / प्राधिकरण यांना माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान लेखी पत्राद्वारे कळविले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू चौकशी करण्याचे आदेशास ३ वर्षांचा कालावधी उलटून गेलेला असतानाही अद्याप या प्रकरणाची कोणतीही चौकशी करण्यात आलेली नसून या प्रकरणी चौकशी करून अहवाल सादर करण्यास जाणीवपूर्वक व हेतु:पूरस्परपणे विलंब करण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणाची चौकशी केली आहे काय, चौकशीनूसार अहवाल सादर करण्यास होत असलेल्या विलंबास जबाबदार असणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच उक्त प्रकरणी दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांनी केलेल्या गैरव्यवहाराची रक्कम त्यांचेकडून वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. जितेंद्र आव्हाड (०५-०१-२०२२) :**(१) व (२) सचिव, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास प्राधिकरण यांच्या अहवालानुसार, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाअंतर्गत कार्यकारी अभियंता, ई-२ विभाग या विभागीय कार्यालयातील देयकांच्या अदायगीमध्ये झालेल्या गैरव्यवहाराबाबत तक्रारदार यांनी दि.१३.७.२०१७ व दि.२५.७.२०१७ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, ई-२ विभाग मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ यांनी फेब्रुवारी २०१७ ते जून २०१७ या कालावधीत सादर केलेल्या ९२६ देयकांची सखोल चौकशी करुन अहवाल १५ दिवासात सादर करण्याबाबत उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी दि.३१.०८.२०१७ च्या आदेशान्वये मुख्य अधिकारी, पुणे मंडळ व कार्यकारी अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण कक्ष, प्राधिकरण यांना कळविले. अनुषंगाने चौकशी समितीने प्राथमिक चौकशी अहवालामध्ये अनियमितता झाल्याचे नमूद असून मंडळाचे आर्थिक नुकसान झाल्याची बाब नमुद नाही.
(३) व (४) मुख्य अधिकारी, पुणे मंडळ व कार्यकारी अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण कक्ष, प्राधिकरण यांनी १५ दिवसाच्या मुदतीत पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल सादर केला. समितीने सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने दोषी अधिकारी / कर्मचारी यांना प्रथम कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून सदर अधिकारी / कर्मचारी यांनी सादर केलेला खुलासा अमान्य करुन त्यांना ज्ञापनांद्वारे दोषारोप बजावण्यात आले आहे. सदर ज्ञापनाच्या अनुषंगाने प्राप्त खुलासा अमान्य करुन विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु करण्यात आली असून सेवानिवृत्त शासकीय अधिकारी यांची चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी म्हणून दि.२५.११.२०२० रोजीच्या आदेशान्वये नेमणूक प्राधिकरणाने केली आहे. त्यानुसार, विभागीय चौकशी सुरु असल्याचे प्राधिकरणाने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डाकीवली-केळठण (जि. पालघर) या रस्त्याच्या दुरुस्ती कामात झालेला गैरव्यवहाराबाबत**

**(९) ३२४०३ (०२-०९-२०२१). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डाकीवली, केळठण, चांबळे या परिसरातील अनेक गावांना जोडणारा व या परिसरातील दहा हजार नागरिकांना ये-जा करण्यासाठी एकमेव असलेल्या डाकीवली-केळठण या रस्त्याची सद्य:स्थिती मोठ्या प्रमाणावर दुरावस्था झाली असल्याची बाब दिनांक २६ जुलै, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, या परिसरात असलेल्या सुमारे २५ हून अधिक लहान-मोठ्या उद्योगधंद्यात दररोज ये-जा करणारी व मालाची वाहतूक करणाऱ्या शेकडो अवजड वाहनांची वर्दळ सातत्याने सुरु असल्याने या रस्त्याच्या दुरावस्थेत दिवसेंदिवस वाढ होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गत १० वर्षांत या रस्त्यांवरील खड्डे भरण्यासाठी सार्वजनिक बांधकाम उपविभाग वाडा यांनी सुमारे ५ कोटी २४ लाख रुपये खर्च केले असतानाही रस्त्याची दुरावस्था कायम आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू रस्त्याच्या गत १० वर्षात झालेल्या दुरुस्तीच्या कामाची सखोल चौकशी शासनाने केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व उपरोक्त प्रकरणी रस्त्याच्या दुरुस्तीकामात गैरव्यवहार करणाऱ्या संबधित अधिकारी व ठेकेदारांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२४-०१-२०२२) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. तथापि सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सदरहू रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

(३) व (४) हे खरे नाही.

सदरहू रस्ता औदयोगिक क्षेत्रातुन जातो. अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे तसेच अतिवृष्टीमुळे काही भागात वारंवार खराब होत असल्याने, रस्त्याच्या लांबीत किरकोळ दुरुस्ती करुन रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात येत आहे.

सदरहू रस्त्यावर आवश्यक वावाप्रमाणे वेळोवेळी विविध योजनांमध्ये दुरुस्तीची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत. त्यानुसार मार्च २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात प्रश्नांकित डाकिवली केळठण भागातील कि.मी.३३/०० ते ३५/०० या लांबीतील काँक्रिटीकरणाच्या बांधकामासाठी ७००.०० लक्ष व गातेस खाणीवली या भागातील कि.मी ०/४०० ते १/४०० व ३/०० ते ३/५०० या लांबीतील काँक्रिटीकरणाच्या बांधकामाकरीता ५००.०० लक्ष रकमेस मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरहू कामे निविदा स्तरावर असून निविदा प्रक्रिया पुर्ण होताच काम चालु करुन निर्धारीत वेळेत पुर्ण करण्याचे नियोजन आहे, तसेच या रस्त्यासाठी पुरहानी कार्यक्रमांतर्गत रु.४४५.०० लक्ष इतक्या रकमेस डांबरीकरणाच्या कामासाठी मंजुरी प्राप्त झाली आहे. सदर काम अंदाजपत्रक स्तरावर आहे.

प्रश्नांकित रस्ता सुस्थितीत ठेवण्यात येत असल्याने या रस्त्याच्या कामात गैरव्यवहार झालेला नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता आरक्षित भूखंडावर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने "बाळासाहेब ठाकरे कलादालन" या नावाने उभारलेल्या वास्तूबाबत

**(१०) ३२४३५ (१७-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत कल्याण येथील सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता आरक्षित भूखंडावर वायले नगर, खडकपाडा येथे "बाळासाहेब ठाकरे कलादालन" या नावाने दुमजली वास्तू उभारण्यात आली असून, सदरहू कलादालनाचे कोणत्याही कलाप्रकाराकरीता वापर करण्यात आलेला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडाच्या तळ मजल्यावर उपायुक्त कार्यालय, पहिल्या मजल्यावर निवडणूक आयोगाचे कार्यालय आहे तर दुसऱ्या माळ्यावर प्रांत कार्यालय अशी विविध कार्यालये वास्तू उभारल्यापासून कार्यरत असल्यामुळे कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने जाणीवपूर्वक गैरव्यवहार व गैरकारभार केल्यामुळे सदरहू कलादालन मूळ उद्देशापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक नागरिकांनी सातत्याने विचारणा केली असता व निवेदने सादर केली असतानाही यासंदर्भात महापालिका प्रशासनाने कोणतीही दखल घेतली नाही तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाकरिता आरक्षित भूखंडावर दुमजली वास्तू उभारण्यात आलेली असताना सुरुवातीपासून कला प्रकारासाठी वंचित ठेवून अन्य प्रयोजनासाठी जागा देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर इमारतीच्या तळ मजल्यावर पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३ कार्यालय, पहिल्या मजल्यावर निवडणूक निर्णय अधिकारी-१३८ कार्यालय तसेच दुसऱ्या मजल्यावर उप विभागीय अधिकारी, कल्याण विभाग यांना तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आलेले आहे. तथापि याबाबतीत गैरव्यवहार झाला अशी वस्तुस्थिती नाही.

(३) व (४) पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील जागेचा कालावधी संपुष्टात आल्याने सदर जागेचे भाडे भरून जागा रिक्त करणेबाबत संबंधित कार्यालयांस कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने दि.२१.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

संबंधित विभागाने पहिला व दुसरा मजला रिक्त केल्यानंतर मूळ प्रयोजनाकरीता सदर जागेचा वापर करण्यात येणार असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पाच्या बांधकामामुळे न्हावे, गव्हाण, घारापुरी हद्दीतील मच्छिमार बांधवांचे होणारे नुकसान तातडीने देण्याबाबत**

**(११) ३२४४२ (१२-११-२०२१). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पाच्या बांधकामामुळे न्हावे, गव्हाण, घारापुरी हद्दीतील मच्छिमार बांधवांचे पारंपारीक उपजिवीकेचे साधान धोक्यात आले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पामुळे उपजिवीकेचे साधन नष्ट झाल्यामुळे मच्छिमार बांधवांच्या कुंटुंबावर उपासमारीची वेळ आली असून मच्छिमार बांधवांनी आपल्या पुनर्वसनासाठी विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत दिनांक २८ जानेवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास मोर्चा काढून आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पाच्या बांधकामामुळे न्हावे, गव्हाण, घारापुरी हद्दीतील मच्छिमार बांधवांचे होणारे नुकसान थांबविण्याबाबत व आंदोलकांच्या मागण्यांबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०१-२०२२) :** (१) मुंबई ट्रॉन्स हार्बर लिंक पुलाच्या समुद्रातील सुमारे १६ किमी. लांबीच्या बांधकामामुळे पुलाच्या दोन्ही बाजुकडील अंदाजे ७५० मी. अंतरापर्यंतच्या मासेमारी व्यवसायावर परिणाम होऊ शकतो या अनुषंगाने बाधीत होणा-या मच्छिमारी व्यावसायीकांना नुकसान भरपाई देण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे

(२) होय, हे खरे आहे.

(३) न्हावा-शिवडी सागरी सेतू प्रकल्पामुळे प्राधिकरणाने बाधित प्रकल्पाच्या मच्छिमारांचे सर्वेक्षण २०१६ मध्ये सुरू केले, मच्छिमार सहकारी संस्थेचे सदस्यत्व प्रमाणीकरण करण्याची अंतिम तारीख ३०.११.२०१६ होती तसेच प्रकल्प बाधित मच्छिमारांकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा कडे अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २०.११.२०१९ हि ठरविण्यात आली होती.

गव्हाण ग्रुप ग्रामपंचायत एकुण ४७८७, न्हावे ग्रामपंचायत एकुण १६४६ व घारापुरी येथील एकुण २६१ अर्ज प्राप्त झाले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत न्हावे, गव्हाण, घारापुरी हद्दीतील एकुण २४८५ मच्छिमारांना नुकसान भरपाई देण्यात आली असुन १३९८ मच्छिमार हे बनावट असुन त्यांचे अर्ज नाकारण्यात येत आहेत व उर्वरित २८०८ मच्छिमारांच्या दस्ताऐवज पुर्ण नसल्याकारणाने प्रतीक्षा यादीमध्ये समावेश करण्यात येत आहे. दि. २८.०१.२०२१ रोजीच्या बैठकीत विनंती केल्याप्रमाणे मच्छिमारांबाबत ग्रामपंचायतीने दिलेला दाखला ग्राह्य धरण्यात येण्याबाबतचा विषय प्राधिकरणाच्या मच्छिमार समन्वय समितीमध्ये दि. १६.०३.२०२१ रोजी झालेल्या ११ व्या बैठकीत ठेवण्यात आला. सदर बैठकीत खालील

प्रमाणे निर्णय घेण्यात आला "गव्हाण ग्रुप ग्रामपंचायत व न्हावे ग्रामपंचायत हे क्षेत्र मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या जवळ असल्यामुळे प्राधिकरणाकडे दि. २०.११.२०१९ पर्यंत प्राप्त झालेल्या परंतु अपात्र ठरलेल्या अर्जातील मच्छिमारांची नावे या ग्रामपंचायतीना कळविण्यात येतील. या ग्रामपंचायतीतील सदर नावे ग्रामसभेच्या पटलावर ठेवतील या अनुषंगाने सदर ग्रामपंचायती महसुल विभाग, गटविकास अधिकारी, मत्स्यव्यववसाय विभाग व प्राधिकरण यांच्या प्रतिनिधीसमक्ष ग्रामसभेचे आयोजन करेल. संपुर्ण उपस्थिती असलेल्या ग्रामसभेमध्ये सदर अपात्र मच्छिमारांच्या नावांचे जाहिर वाचन करुन यापैकी पात्र अशा मच्छिमारांच्या नावांची शिफारस करेल व ग्रामपंचायत सदर मंजुर नावांची ग्रामसभेच्या इतिवृत्तामध्ये सुयोग्य नोंद करुन त्यानुसार प्राधिकरणास कळवेल. "त्याअनुषंगाने न्हावा ग्रामपंचायत व गव्हाण ग्रूपग्रामपंचायत दि. ०२ ऑक्टोबर २०२१ रोजी ग्रामसभा आयोजित करण्यात आली असून गव्हाण ग्रुप ग्रामपंचायत यांचा ठराव व सुधारीत यादी दि. ०३.११.२०२१ रोजी प्राप्त झाली आहे. उर्वरित न्हावा ग्रामपंचायत यांचा ठराव व सुधारीत यादी प्राप्त झाल्यानंतर दोन्ही ग्रामपंचायतीची अद्ययावत यादी मच्छिमार पात्रता पडताळणी समिती (FEVC) समोर पुढील कार्यवाहीकरीता सादर करण्यात येणार आहे

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (पूर्व) चेतना शाळा ते नेवाळी नाका श्रीमलंग**
**या रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत**

**(१२) ३२४७६ (२३-११-२०२१). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कल्याण (पूर्व) चेतना शाळा ते नेवाळी नाका मलंग हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असून पालिकेने सुमारे ४० कोटीचा निधी खर्च करूनही रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून संबंधित अधिकारी व कंत्राटदारांनी संगनमताने कोट्यावधी रुपयाचा गैरव्यवहार व अपहार केल्याप्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्याकडे दिनांक ४ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास तक्रारवजा लेखी पत्र सादर करून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांचे निलंबन करण्यात यावे तसेच कंत्राटदाराला काळे यादीत टाकण्यात यावे अशा आशयाची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व कंत्राटदरांवर कोणती कारवाई करण्यात केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (११-०१-२०२२) :** (१) अशा आशयाचे निवेदन कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला प्राप्त झाले, ही वस्तुस्थिती आहे.

(२) व (३) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण (पूर्व) चेतना शाळा ते नेवाळी नाका श्रीमलंग रोड या रस्त्याचे ४०५०.० मी. लांब व ३०.० मी. रूंद विकास आराखड्याप्रमाणे रूंदीकरणाचे काम मे. रेल्कॉन इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि. मुंबई या ठेकेदारामार्फत दि.१३.०४.२०१७ रोजी सुरू करण्यात आले.

• सदर कामाचा कालावधी दि.१२.०९.२०१८ पर्यंत होता. सदर रस्त्याचे ३८६० मी. लांबीचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. उर्वरित १९० मी. लांबीच्या कामास व्दारली व भाल गावातील नागरिकांचा रस्ता रूंदीकरणास विरोध असल्याने विहीत वेळेत काम पूर्ण करता आलेले नाही.

• उर्वरित कामे करण्यास महानगरपालिकेमार्फत ठेकेदारास दि.३१.०५.२०२१ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली, तथापि, स्थानिकांकडून वारंवार कामात अडथळे आणून काम बंद करण्यात येत आहे. सदर रस्ता सद्यस्थितीत सुस्थितीत आहे.

• रस्त्याच्या कामाकरीता वापरण्यात आलेल्या साहित्यांच्या वारंवार दक्षता व गुणनियंत्रण विभागाकडून व खाजगी प्रयोगशाळेकडून चाचण्या केलेल्या आहेत. सदर कामात कोणताही भ्रष्टाचार झाला, अशी वस्तुस्थिती नाही.

• सदर रस्त्याचे ज्या प्रमाणात काम झाले त्याच प्रमाणात देयक अदा केल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकिय अधिकाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियुक्तीबाबत**

**(१३) ३२५१४ (११-०१-२०२२). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल):** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय सेवेत असतांना एखाद्या अधिकाऱ्याचा मृत्यू झाल्यास त्याच्या कुटूंबातील एका व्यक्तीस अनुकंपा तत्वावर शासकीय सेवेत नियूक्ती देण्याचा महत्वपूर्ण निर्णय शासनाने दि. २६ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासूमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयानूसार राज्यात आतापर्यंत किती उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नोकऱ्या देण्यांत आलेल्या आहेत, अद्यापही या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच राज्यातील ३० हजाराहून आधिक अनुकंपा धारकांना शासन सवेत घेण्याकरीता अनुकपांधारकांचा शासनाकडे वेळोवेळी पाठपूरावा सूरू असुन याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे राज्यमंत्री महोदय यांच्या समवेत दिनांक १६ फेब्रुवारी, २०२१ रोजी मंत्रालय मुंबई येथे बैठक घेण्यात आली होती हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २३ एप्रिल, २००८ च्या शासन निर्णयातील नियमाप्रमाणे पहिल्या वर्षी ५० टक्के, दुस-या वर्षी २५ टक्के व तिस-या वर्षी २५ टक्के या प्रमाणे डिसेंबर, २०२० अखेर अनुकंपा नियुक्तिसाठी प्रतिक्षा सुचितील उमेदवारांना नियुक्ती देणाचा प्रस्ताव मा.मंत्री मंत्रीमंडळासमोर सादर करण्या बाबत कार्यवाही करावी असे निर्देश देण्यात आले होते. याबाबत सामन्य प्रशासन विभागाने कोणती कार्यवाही केली आहे,

(५) तसचे, राज्यातील अनुकंपा धारकांच्या नियुक्त्या करण्याबाबत क्षेत्रीय कायर्लायांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने संबंधित विभागांनी कोणती कार्यवाही केली आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
दि.२७.०९.२०२१ च्या आदेशान्वये अनुकंपा नियुक्तीचे धोरण गट-अ व गट-ब मधील शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आले आहे.
(२) अनुकंपा नियुक्ती योजनेनुसार दिवंगत कर्मचाऱ्याच्या पात्र सदस्याचे नाव संबंधित कार्यालयाच्या प्रतिक्षासूचीवर व संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिकाऱ्यांकडील सामायिक प्रतिक्षा यादीवर घेण्यात येते. प्रतिक्षा यादीमधील ज्येष्ठतेनुसार पदांच्या उपलब्धतेप्रमाणे नियुक्ती प्राधिकारी अथवा संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून नियुक्ती देण्यात येते.
(३) (४) व (५) अनुकंपा नियुक्तीसाठीच्या प्रतिक्षासूचीमध्ये एकूण ११,२१३ उमेदवार म्हणजेच फार मोठया प्रमाणात दीर्घ कालावधीपासून उमेदवार नियुक्तीच्या प्रतिक्षेत होते. त्यामुळे या उमेदवारांना लवकरात लवकर नियुक्ती मिळावी या अनुषंगाने काही उपाययोजना करणे शक्य आहे का या कारणास्तव दि.१६ फेब्रुवारी, २०२१ रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.
प्रतिक्षाधीन उमेदवारांना जलदगतीने अनुकंपा नियुक्ती मिळावी यास्तव खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आली आहे.
अ) अनुकंपा नियुक्त्या तातडीने होण्याच्या अनुषंगाने यासंबंधीच्या कार्यपध्दतीमध्ये असणारा संभ्रम दूर करुन अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्यास सहाय्यभूत होण्यासाठी दि.२६.०८.२०२१ च्या परिपत्रकान्वये अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) प्रसिध्द करण्यात आली आहे.
ब) त्यानंतर विविध विभागांमधील अनुकंपा नियुक्तीचा आढावा घेण्यात आला असता गट-क च्या २,५५५ व गट-ड च्या १,०६७ अशा एकूण ३,६२२ उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देण्यात आली आहे.
क) अनुकंपा नियुक्तीद्वारे भरावयाच्या पदांची टक्केवारी पूर्वीप्रमाणेच १० टक्के न ठेवता दि.३१.१२.२०१४ पर्यंत तीन वर्षासाठी २० टक्के ठेवण्याबाबत दि.२२.१२.२०२१ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिका क्षेत्रातील दिव्यांगाना व्हिलचेअर उपलब्ध करुन न दिल्याबाबत

**(१४) ३२५७० (१७-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिका क्षेत्रात १५ हजार दिव्यांगाची नोंदणी असून २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत दिव्यांग मतदारांच्या सोयीसाठी निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार व्हिलचेअर उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार दिव्यांग मतदारांच्या सोयीसाठी व्हिलचेअर उपलब्ध करुन देण्यात आल्या असतांनाही प्रत्यक्षात त्या दिव्यांगाना उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांना गंज पडला असल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू व्हिलचेअर धूळखात पडून असल्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदरहू व्हिलचेअर दिव्यांगाना उपलब्ध करुन न दिल्याने जबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३१-०१-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) विधानसभा सार्वजनिक निवडणूक २०१९ च्या मतदानाच्या दिवशी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील दिव्यांगाना एकूण १५ व्हिलचेअर उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

• निवडणूक आयोगाकडून दिव्यांगाना फक्त मतदानाच्या दिवशीच व्हिलचेअर वापरणेबाबत कळविले असल्याने मतदानानंतर सदर व्हिलचेअर "ब" प्रभागक्षेत्र कार्यालयात जमा करून टेरेसवर ठेवण्यात आलेल्या आहेत.

• सदर व्हिलचेअर वापरण्यायोग्य असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेला ठेकेदार असलेल्या तिघा भागीदारांनी बनावट दस्ताऐवज बनवून केलेला गैरव्यवहाराबाबत**

**(१५) ३२५७१ (१७-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली (जि.ठाणे) महापालिकेमध्ये ठेकेदार असलेल्या तीन भागीदारांनी बनावट दस्ताऐवज बनवून सुमारे २० कोटी ७० लाख रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कल्याण-डोंबिवली महापालिका प्रशासनाने सन २००५ मध्ये मेसर्स एस.एम.असोसिएट या संस्थेला ठेकेदार म्हणून नियुक्त केल्यानंतर भागीदार असणाऱ्या या ठेकेदारांनी काम अपूर्ण करुन बनावट कागदपत्रांचा दस्तऐवज तयार करुन याच कंपनीला अनुसरुन दुसरी कंपनी बनवून सुमारे २० कोटी ७० लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याप्रकरणी कार्यकारी अभियंता, श्री.तरुण जुनेजा यांनी खडकपाडा पोलीस स्टेशनमध्ये फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशी अंती महापालिकेची आर्थिक लूट करणाऱ्या भागीदार ठेकेदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२२) :** (१) व (२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने जनतेच्या कल्याणाकरीता व जनतेच्या व्यापक हिताकरीता जाहीर निविदा मागवून बी.ओ.टी. तत्वावर काम हाती घेतले होते.

• सदर कामामध्ये मे.एस.एम. असोसिएट्स भागिदारी संस्था क्र. बीए-६२७३६ व मे. मे.एस.एम. असोसिएट्स भागिदारी संस्था क्र. बीए-१०२७२३ या भागिदारी संस्थांनी एक सारख्या नावाचा फायदा घेऊन संगनमताने नियमबाह्य खोटी कागदपत्रे सादर करून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे जागाभाडे व त्यावरील व्याजापोटी रू.२०,६९,६४,५८४/- इतके आर्थिक नुकसान केले आहे.

• सदर प्रकरणी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने सर्व संबंधितांविरूध्द दि.०५.०४.२०२१ रोजी खडकपाडा पोलीस स्टेशन, कल्याण (प.) यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला.

• त्यासअनुसरून खडकपाडा पोलीस स्टेशनमार्फत कागदपत्रांची छाननी व प्राथमिक चौकशी करून गुन्हा रजिस्टर नं.I २८२/२०२१ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला, ही वस्तुस्थिती आहे.

(३) सदर विकासकांचा करार दि.०८.०३.२०१८ रोजी खंडीत करून महानगरपालिका अधिनियमातील कलम ८१(ब) नुसार त्यांच्यावर कारवाई सुरू केलेली आहे.

• त्याविरूध्द विकासकाने आर्बिट्रेशन दावा केलेला असून कनिष्ठ न्यायालयाच्या स्थगिती आदेशाविरूध्द महानगरपालिकेने मा. उच्च न्यायालयात अपिल दाखल केलेले आहे. सदर प्रकरण सद्यस्थितीत मा.उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.

• त्याचप्रमाणे खडकपाडा पोलीस स्टेशन, कल्याण (प.) येथे दाखल फौजदारी गुन्ह्याचा तपास सद्या सुरू असल्याचे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिर्डी विमानतळाच्या सभोवतालचा परिसर विकसीत करुन सर्व सुविधानी युक्त शहर बसविण्यासाठी माहितीबाबत

**(१६) ३२६२५ (११-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.चिमणराव पाटील (एरंडोल)** :सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिर्डी विमानतळाच्या सभोवतालचा परिसर विकसीत करुन सर्व सुविधानी युक्त शहर बसविण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे संचालक मंडळ आणि राज्याचे मा.मुख्यमंत्री यांच्या दि.२९ सप्टेंबर, २०२१ झालेल्या संयुक्त बैठकीत निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औद्योगिक विकास, पर्यटनाला चालना व रोजगार निर्मितीच्या अनुषंगाने विकास आराखडा तयार करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, सर्व सुविधांनी युक्त शहर कार्यान्वीत होण्यासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे वा निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) आराखडा तयार करण्यात येत आहे.

(३) शिर्डी विमानतळ सभोवतालच्या परिसराचा विकास करण्याबाबतच्या निर्णयाला महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या संचालक मंडळामार्फत दि.२९.०९.२०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आल्या नंतर, सदर ठरावाच्या पुढील कार्यवाहीच्या अनुषंगाने नगर विकास विभागाची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या तरतुदीनुसार मान्यता घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील स्वारगेट ते कात्रज भूमिगत मेट्रो मार्गाच्या प्रस्तावाबाबत**

**(१७) ३२६४० (२५-११-२०२१). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे जिल्ह्यातील स्वारगेट ते कात्रज भूमिगत मेट्रो मार्गाचा प्रस्ताव राज्य शासनाकडे मंजूरीसाठी असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे शहरातील स्वारगेट ते कात्रज भूमिगत मेट्रो मार्गाचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेच्या वतीने मंजूर होऊन राज्य शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच महामेट्रोने प्रस्तावित केलेल्या ‘स्वारगेट ते कात्रज’ या भुयारी मेट्रो मार्गावर घेण्यात आलेल्या स्थानकांमध्ये धनकवडी आणि बालाजीनगर भागातील नागरिकांच्या सोयीसाठी बालाजी नगर येथे स्थानकाची मागणी प्रस्तावित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०१-२०२२) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) व (५) मा. लोकप्रतिनिधी व स्थानिक नागरिक यांनी नवीन मेट्रो स्थानकाबाबत दिलेली निवेदने महामेट्रोच्या स्तरावर तपासण्यात येत आहेत.

---

**स्वातंत्र्यसैनिकाच्या पत्नीला चाळीस वर्षांपासून निवृत्तीवेतन न मिळाल्याबाबत**

**(१८) ३२७६० (०७-०१-२०२२). श्री.प्रमोद (राजू) रतन पाटील (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन १९४२ या कालावधीत चलेजाव चळवळीत सहभाग घेतलेल्या दिवंगत स्वातंत्र्य सैनिकांच्या योजनेसाठी पात्र ठरवूनही पत्नी (श्रीमती चव्हाण) यांना निवृत्तीवेतनासाठी गेली चाळीस वर्षे शासकीय यंत्रणांच्या दारात हेलपाटे घालावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त याचिकाकर्ती श्रीमती शालिनी चव्हाण यांचे पती श्री.लक्ष्मण चव्हाण हे स्वातंत्र्यसैनिक असून त्यांनी कारावास भोगल्याची आवश्यकती कागदपत्रे जमा केली असून स्वतंत्रता सैनिक पेन्शन योजनेच्या लाभासाठी पात्र असल्याचे स्पष्ट झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २०१६ या कालावधीत रायगडचे जिल्हाधिकारी आणि शासनास पत्रव्यवहार करुनही त्यांच्या दाव्याच्या पडताळणीचे आणि अहवाल सादर करण्याचे आदेश शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी स्वतंत्रता सैनिक पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (०२-०२-२०२२) :** (१) व (२) नाही.

श्रीमती. शालिनी लक्ष्मण चव्हाण यांनी सादर केलेल्या कै. लक्ष्मण रामचंद्र चव्हाण यांच्या जेल प्रमाणपत्राबाबतचा अधीक्षक, जिल्हा कारागृह वर्ग -१, भायखळा, मुंबई यांचा पडताळणी अहवाल नकारार्थी असल्यामुळे शासन निर्णय दि.०४.०७.१९९५ व दि. ०२.०६.२०१६ मधील तरतूदींनुसार स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतन मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती यांच्या मान्यतेने नामंजूर करण्यात आला होता.

(३) होय, खरे आहे.

(४) मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील रिट याचिका क्र. २००७४ /२०२१ शालिनी चव्हाण वि. महाराष्ट्र शासन व इतर या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने

दि. ०७.१०.२०२१ रोजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड यांनी या प्रकरणी आवश्यक पुरावे जमा करून राज्य शासनास सादर करावेत. त्या आधारे शासनाने यथोचित निर्णय घ्यावा. तसेच,

याचिकाकर्तीचे वय लक्षात घेता या प्रकरणीच्या अंतिम निर्णयास अधीन राहून याचिकाकर्तीस ऑक्टोबर, २०२१ पासून तात्पुरत्या स्वरूपाचे स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन मंजूर करावे, असे अंतरीम

आदेश दिलेले आहेत. तद्नुषंगाने शासन निर्णय दि. १.११.२०२१ अन्वये श्रीमती शालिनी चव्हाण यांना ऑक्टोबर, २०२१ पासून तात्पूरते स्वातंत्र्य सैनिक निवृत्तीवेतन मंजूर करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यामध्ये महानेट प्रकल्पांतर्गत सुरू असलेले फायबर ऑप्टिकल केबल (FOC) चे काम करताना कंपनीकडून नियम व अटींचे उल्लंघन केलेबाबत**

**(१९) ३२८५१ (११-०१-२०२२). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये महानेट प्रकल्पांतर्गत सुरू असलेले फायबर ऑप्टिकल केबल (FOC) चे काम करताना कंपनीकडून करार नाम्यातील नियम व अटींचे उल्लंघन केलेबाबत व खोटी कागदपत्रे तयार करून कोट्यावधी रुपयांची देयके अदा केलेबाबत संबंधीतांवर कायदेशीर

कारवाई करण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधी यांनी मा.व्यवस्थापकीय संचालक, महा आयटी यांचेकडे वेळोवेळी दिलेल्या लेखी निवेदानाव्दारे दि.१७ ऑगस्ट, २०२१ वा त्यासुमारास केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोल्हापूर जिल्ह्यामध्ये चुकीच्या पध्दतीने खुदाई करण्यात आल्याबाबत मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेसमवेत दि.२९ जानेवारी, २०२१ रोजी झालेल्या बैठकीमध्ये संबंधीत कंपनीवर २५% पर्यंत दंडात्मक कारवाई करण्या बाबत प्रधान सचिव, माहिती व तंत्राज्ञान, मंत्रालय, मुंबई यांचेकडे कारवाईचा अहवाल पाठविण्यात आला आहे त्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने केलेल्या कारवाईची तपशीलवार माहिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (२८-०२-२०२२) :** (१) नाही.

(२) जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी कळविल्याप्रमाणे दि.२९ जानेवारी, २०२१ रोजी जिल्हाधिकारी यांच्या सोबत झालेल्या बैठकीत अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून तपासून प्राप्त झालेल्या अहवालाप्रमाणे दंडात्मक कारवाईचे पत्र माहिती व तंत्रज्ञान विभागास कळविण्याच्या सूचना दिल्या होत्या. परंतु मा. जिल्हाधिकरी यांचे लेखी सुचनेनुसार बैठकीतील मुद्दा क्रमांक १ नुसार याबाबत अधिकृत सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी नियंत्रण अधिकारी म्हणून नेमण्यात येत आहे व त्यांनी सर्व यंत्रणामार्फत झालेल्या कामांची तपासणी / नमुना तपासणी करून चुकीच्या पद्धतीने कामे केली असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधीत कंत्राटदारा विरूद्ध शास्ती प्रस्तावित करावी असे नमूद केले. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या प्राप्त अहवालानुसार चुकीच्या पद्धतीने खुदाई केलेले, नियम व अटींचे उल्लंघन केलेबाबत व खोटी कागदपत्रे सादर केलेले आढळून येत नाही. तसेच चंदगड व भूदरगड येथे कोणत्याही त्रुटी नसल्याचे अहवाल प्राप्त आहे व आजरा आणि शाहूवाडी येथील अहवालानुसार रस्ता पुर्ववत करणे संदर्भात त्रुटी दिसून येतात. त्याबाबत संबंधित कंपनी यांनी पुढील २ आठवड्यात आजरा व शाहूवाडी येथील रस्ता पुर्ववत करणे व इतर त्रुटींची पुर्तता करून देण्याचे आश्वासन दि.११.०२.२०२२ रोजीच्या ई-मेलद्वारे कळविले आहे. त्यामुळे संबंधित कंपनीवर २५ % पर्यंत दंडात्मक कारवाईचे पत्र प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय मुंबई यांचेकडे कारवाईचा अहवाल पाठविण्यात आला नाही. त्यामुळे कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) लागू नाही.

(४) विलंब नाही.

---

**पिंपळगाव (जि.नाशिक) बसवंत टोलनाक्यावरील अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणालाच कोट्यावधीचा गंडा घातल्याबाबत**

**(२०) ३२९२६ (११-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातत्याने वादात सापडत असलेल्या पिंपळगाव बसवंत टोलनाक्यावरील अधिकाऱ्यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणालाच कोट्यावधीचा गंडा घातल्याचा धक्कादायक प्रकार १७ सप्टेंबर, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गैरव्यवहार टोल वसूल करण्यात येणाऱ्या सॉफ्टवेअर द्वारा करण्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे का,

(३) असल्यास, सदर विषयी संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. अशोक चव्हाण (१७-०२-२०२२) :** (१) पिंपळगाव बसवंत टोल प्लाझा हा केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाच्या अधिनस्थ भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

हे खरे नाही, असे संबंधित प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळवून पुढील खुलासा केला आहे :-

दि.१७ सप्टेंबर, २०२१ रोजी स्थानिक जमावाने टोल प्लाझा ऑफिसमध्ये प्रवेश करुन कर्मचा-यांना मारहाण केली व वस्तुस्थितीची/करारातील कोणत्याही गोष्टीची शहानिशा न करता तथ्यहीन आरोप केले आहेत.

(२) हे खरे नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांना कळविले आहे.

(३) सदरहू घटनेची सर्वांगिण आणि सखोल चौकशी सुरु असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांना कळविले आहे.

(४) विलंब झाला नसल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

---

**सेवानिवृत्त होऊन ही मुंबईतील विविध भागात असलेली सरकारी निवासस्थाने न सोडल्याबाबत**

**(२१) ३२९६२ (११-०१-२०२२). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सेवानिवृत्त होऊन महिने लोटले, बदली होऊन काही वर्ष झाली तरी मुंबईतील विविध भागात असलेली सरकारी निवासस्थाने सोडण्याचा मोह लहान मोठ्या अधिकाऱ्यांना होत नसल्याची बाब १४ ऑगस्ट, २०२१ वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेकांना निवासस्थाने रिकामे करण्यासाठी नोटीसही बजावण्यात आलेले असून सदर निवास्थाने मलबार हिल, चर्चगेट, वांद्रे, पवई आदी भागांमध्ये आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर विषयी शासनातर्फे संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्री. उद्धव ठाकरे (०८-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे ही खरे आहे.
(३) शासनाच्या दि.१३.८.२०२१ रोजीच्या पत्रान्वये महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) यांना संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवानिवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्तीवेतन/ वेतनातून शासकीय निवासस्थानाच्या अनुषंगाने भाडे वसुली करण्याबाबत कळविण्यात आले आहे. तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या कार्यालय प्रमुखांनाही याबाबत माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने केंद्र सरकारच्या बीएसयुपी कचोरे, उंबर्डे, बारावे, बांधलेल्या इमारतीमधील लिफ्ट गायब वा चोरीला गेल्याबाबत**

**(२२) ३३०८८ (१७-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण डोंबिवली महानगरपालिका प्रशासनाने केंद्र सरकारच्या बीएसयुपी कचोरे, उंबर्डे, बारावे, बांधलेल्या इमारतीमधील लिफ्ट गायब वा चोरीला गेल्याची घटना दिनांक ४ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे व त्यात काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, त्यानुषंगाने इमारतीची देखरेख व लिफ्ट चोरी होऊ नये म्हणून पालिका प्रशासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२८-०१-२०२२) :** (१) मौजे कचोरे येथील बीएसयुपी प्रकल्पाच्या इमारतीत चोरीची घटना घडल्याचे निदर्शनास आल्याची वस्तुस्थिती महानगरपालिकेने कळविली आहे.
(२) मौजे कचोरे येथील बीएसयुपी इमारतीमधील चोरीच्या घटनेबाबत टिळक नगर पोलीस स्टेशन, डोंबिवली (पूर्व) यांना संबंधित चोरीचा तपशील देऊन गुन्हा दाखल करणेबाबत दि.२४.०९.२०२१ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(३) सदर ठिकाणी महानगरपालिकेच्या सुरक्षा विभागामार्फत सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली असल्याचे, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी तालुक्यातील ठाणे-भिवंडी-वडपा (विशेष राज्यमार्ग) रस्त्याच्या कामात होत असलेल्या भ्रष्टाचाराबाबत**

**(२३) ३३०९२ (११-०१-२०२२). श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भिवंडी तालुक्यातील ठाणे-भिवंडी-वडपा (विशेष राज्यमार्ग) कि.मी. ०/०० ते ८/०९० मध्ये रस्त्याच्या मध्यापासून दोन्हीबाजूस १५ मीटर. रस्त्याची रुंदी ही दोन्ही बाजूना असताना

प्रत्यक्षात ११ मीटर इतकीच असून,गटर व युटीलीटी डक्ट, रस्ता दुभाजक, साईडपट्टी इ. असे मिळून २२ मीटर असताना ३० मीटर रुंदीचा रस्ता दाखवून आर्थिक घोटाळा होत असल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. १ सप्टेंबर २०२१ रोजी मा. मुख्यमंत्री, सार्वजनिक बांधकाम मंत्री, मा. मुख्य सचिव, मा. अप्पर मुख्य सचिव (सा.बां), मा. सचिव (सा.बां),यांना ईमेल द्वारे निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पासाठी ११० खातेदाऱ्यांच्या ६७९० चौमी इतक्या खाजगी जमिनीचे संपादन झाले असून त्यापैकी ६६ खातेदारांना मोबदला देण्यात आलेला असून ४० खातेदारांना अद्याप मोबदला देण्यात आलेला नाही हे खरे आहे काय,

(३) असल्यास रस्त्याच्या सुशोभिकरणासाठी कंपनीला ९५ लाख रुपये खर्च करायचे होते पण कंपनीकडून त्यावर कोणताही खर्च करण्यात आलेला नाही हे हि खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपनीने रस्त्याचे काम पूर्ण न होता पथकर वसुलीसाठी रस्ता पूर्ण झालेला नसताना सदर रस्त्याचे काम झाल्याचे तात्पुरते पूर्णत्व प्रमाणपत्र मा. कार्यकारी अभियंता ठाणे यांनी दिले हे खरे आहे काय,

(५) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने मा. मुख्यमंत्री, महोदयांनी दि. २ सप्टेंबर २०२१ रोजी सबंधित वरिष्ठ अधिकारी यांना चौकशी करण्याचे निर्देश दिले हे खरे आहे काय, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे का चौकशीत काय आढळून आले, त्याअनुषंगाने सदर प्रकरणी सबंधित दोषी अधिकारी यांच्यावर काय कारवाई केली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोकराव चव्हाण (२२-०२-२०२२) :** (१) दि.०१.०९.२०२१ चे निवेदन प्राप्त आहे.

(२) सदर प्रकल्पासाठी एकूण २६३ भुधारक बाधीत झाले असून त्यापैकी १७० भुधारकांना आर्थिक मोबदला देण्यात आला असून ९३ भुधारकांना आर्थिक मोबदला देणे प्रलंबित आहे.

(३) सदर खाजगीकरणांतर्गत कामाच्या करारनाम्यात रस्त्याच्या सुशोभिकरणाकरीता तरतुद होती हे खरे आहे.

(४) सवलत करारनाम्यातील कलम ९.३(९) खंड १ अनुसार दि.०९.११.२०११ च्या पत्रान्वये संबंधित कार्यकारी अभियंता (संबंधित अधिक्षक अभियंता यांची प्रतिस्वाक्षरी) यांनी तात्पुरते पुर्णत्व प्रमाणपत्र निर्गमित केले हे खरे आहे

(५) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दि. ०१.०९.२०२१ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांना दिलेल्या निवेदनावर कार्यवाही प्रगतीत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयातील अंबरनाथ (पुर्व) येथे नगरपालिका उद्यानाची संरक्षक भिंत कोसळून झालेल्या अपघाताबाबत**

**(२४) ३३१८६ (०२-०२-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील अंबरनाथ (पुर्व) भागातील महालक्ष्मी नगर परिसरातील गॅस गोडावून समोरील पालिका उद्यानाची आर.सी.सी. बांधकाम असलेली संरक्षक भिंत दिनांक ६ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास कोसळून झालेल्या अपघातात दोन व्यक्तींचा जागीच मृत्यू झाला व दहा जण गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२२) :** (१) सदर अपघातामध्ये दोन व्यक्तींचा मृत्यु झाला असून इतर कोणीही जखमी झाले नसल्याची वस्तुस्थिती नगरपरिषदेने कळविली आहे.
(२) व (३) सदरची घटना नैसर्गिक आपत्तीमुळे झाली असून मृत व्यक्तींच्या वारसांना नियमानुसार देय असलेली आर्थिक मदत तहसिलदार, अंबरनाथ यांचेमार्फत तातडीने देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाकडे जाणा-या दुर्गापूर रस्त्याच्या सुरू असलेल्या बांधकामाला निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(२५) ३३२८५ (११-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाकडे जाणा-या दुर्गापूर रस्त्याच्या (रा.मा. ३७१) सुरू असलेल्या बांधकामाला निधी उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिनांक १७ जानेवारी, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही झाली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (२३-०२-२०२२) :** (१) होय.
(२ व (३) सदर रस्त्याच्या कामाची अंदाजित किंमत रू.२८.०० कोटी इतकी आहे. सदर कामासाठी सन २०२०-२१ मध्ये रू.१४१.९४ लक्ष व सन २०२१-२२ मध्ये आतापर्यंत रू.६१५.०० लक्ष असे एकूण रु.७५६.२६ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदर काम प्रगतीपथावर असून निधीच्या उपलब्धतेनूसार सदर कामास निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

**राज्य शासनातर्फे गट-ब (अ-राजपत्रित) आणि गट क संवर्गाची सरळसेवा पदभरती प्रक्रियेबाबत**

**(२६) ३३३२० (११-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनातर्फे गट-ब (अ-राजपत्रित) आणि गट क संवर्गाची सरळसेवा पदभरती प्रक्रिया खाजगी आय टी कंपन्याकडून न करता महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत परिक्षा घेऊन नोकरी पद भरती प्रक्रिया राबविण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन दि. २६ मे, २०२१ रोजी पासून वारंवार मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना लोकप्रतिनिधीनी दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनानुसार अद्यापपर्यंत कोणताच निर्णय न घेण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने निर्णय घेतला असल्यास, त्यांचे स्वरुप काय आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) होय
(२), (३), व (४) राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व शासकीय कार्यालयातील भूतपूर्व निवडमंडळाच्या कक्षेतील गट-ब (अराजपत्रित), गट-क संवर्गातील पदभरती महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत करण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाशी विचारविनिमय करण्यात येत आहे.

---

**परभणी जिल्हयातील जिंतूर ते सेनगाव या राज्य रस्त्याच्या दुरावस्थेबाबत**

**(२७) ३३३६९ (११-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) :**सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्हयातील सर्वात महत्त्वाच्या असलेल्या विदर्भ मराठवाडा ला जोडणारा जिंतूर ते सेनगाव या राज्य रस्त्यावरील मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने त्याचे काम करण्यात आले होते मात्र हा रस्ता वाहतुकीस खुला झाल्यानंतर अवघ्या पंधरा दिवसातच महावितरण कंपनीने पुन्हा रस्त्याचे खोदकाम त्यांच्या कामासाठी केल्याने वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे ऑक्टोबर, २०२१ च्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास सार्वजनिक बांधकाम विभाग व महावितरण यांच्या समन्वयाअभावी नागरिकांना हा मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे समजते हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्यस्थितीत सदर रस्त्यावर अनेक अपघात होत असल्याचे समजते हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासन सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करणार काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०२-२०२२) :** (१) सदर लांबीत हॉयब्रीड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर कामामध्ये विद्युत वाहिन्या स्थलांतरित करणे करिता विद्युत वितरण कंपनीने रस्ता खोदून वाहिन्या स्थलांतरित केल्या आहेत हे खरे आहे.
सद्यस्थितीत खोदलेला रस्ता पूर्ववत करुन वाहतूकी करीता सुस्थितीत आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगर परिषद हद्दीतील कामे निकृष्ठ दर्जाची केल्याबाबत**

**(२८) ३३५०९ (२३-११-२०२१). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगर परिषद हद्दीतील एम.एम.आर.डी.ए. च्या माध्यमातून बाह्य रस्ते विकास योजने अंतर्गत मंजूर असलेल्या आर.ई.इन्फ्रा तसेच ए.पी.आय. या दोन एजन्सीने केलेली कामे अतिशय निकृष्ठ दर्जाची केलेली असून अतिशय संथगतीने व वेळेत कामे पूर्ण केली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले तदनुसार अत्यंत निकृष्ठ दर्जाची व वेळेत कामे पूर्ण न करता नागरिकांना वेठीस धरणाऱ्या आर.ई.इन्फ्रा व ए.पी.आय.या दोन्ही एजन्सी ना काळ्या यादीत टाकून त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१७-०१-२०२२) :** (१) अंशतः खरे आहे.

(२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत बाह्य रस्ते विकास योजने अंतर्गत मंजूर ४ कामांपैकी ३ कामे विहीत वेळेत पूर्ण करण्यात आलेली आहेत. उर्वरीत एका कामाची (८०% पूर्णत्व) विहीत मुदत संपलेली असल्याने मे. आर.ई.इन्फ्रा यांना दि. १५/११/२०२१ पासून निविदेतील अटी व शर्तीनुसार काम पूर्ण होईपर्यंत प्रतिदिन रु. १०,०००/- इतका दंड लावण्यात आलेला आहे. तसेच कामाच्या दर्जाबाबत प्राधिकरणाच्या स्तरावर चौकशीबाबतची कार्यवाही सुरु आहे. चौकशी बाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर याबाबत पुढील कार्यवाही सत्वर करण्यात येईल.

---

**ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील विकास कामांच्या निविदा वेळेत उघडण्यात आल्या नसल्याबाबत**

**(२९) ३३५१६ (०२-०२-२०२२). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **नगर विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपरिषद हद्दीतील विकास कामांच्या निविदा या ठराविक व मर्जीतील ठेकेदाराला मिळाव्यात याकरिता कोणत्याच निविदा वेळेत उघडण्यात आल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले व तदनुसार निविदा उघण्याच्या तारखेला निविदा न उघडता आपल्या मर्जीतील ठेकेदाराला निविदा मिळण्यासाठी उशिराने निविदा उघडणाऱ्या नगरपालिकेच्या संबधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) नगरपरिषदेमार्फत केल्या जाणाऱ्या विकास कामासाठी सन २०१६ पासून ई-निविदा मागवून कामे केली जातात. नगरपरिषदेने आतापर्यंत केलेल्या कामांना ठेकेदाराचा पुरेसा प्रतिसाद मिळालेला आहे.

- मात्र अपवादात्मक परिस्थितीमध्ये काही निविदांना पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे फेरनिविदा काढाव्या लागल्या आहेत.
- तीनपेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्यास नव्याने निविदा बोलविण्यात याव्यात अशा सूचना नगरपरिषद प्रशासन संचालनालयाकडील स्थायी निर्देश क्र.३६ मध्ये दिलेल्या आहेत.
- सन २०२१-२२ मध्ये आजतागायत एकूण ५२ निविदा प्रसिध्द करण्यात आल्या असून त्यापैकी ४९ निविदांबाबत निविदा प्रक्रिया पुर्ण करण्यात आली असल्याची वस्तूस्थिती संबंधित नगरपरिषदेने कळविली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री, ग्रामसडक योजना, (जि.हिंगोली) येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या अधिकारी यांच्या भ्रष्टचाराबाबत**

**(३०) ३३५५२ (११-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री, ग्रामसडक योजना, हिंगोली येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या श्रीमती सविता शि. कटारे (शालगर) यांच्या कार्यपध्दतीबाबत व भ्रष्ट कारभाराबाबत जिल्हयातील विविध सामाजिक संघटना व लोकप्रतिनिधि व नागरिकांकडून अनेक तक्रारी मा.ग्रामविकास मंत्री, मा.सार्व.बांधकाम मंत्री, व अप्पर मुख्य सचिव, सार्व.बांधकाम, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान लेखी स्वरुपात निवेदन/तक्रारी करण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री, ग्रामसडक योजना, हिंगोली येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या श्रीमती सविता शि कटारे (शालगर) यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ७ व १२ अंतर्गत हिंगोली शहर पोलिस ठाण्यात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली यांनी लाच घेतल्याप्रकरणी गुन्हा दाखल करुन त्यांना दि.१६ सप्टेंबर, २०२० रोजी अटक करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री, ग्रामसडक योजना, हिंगोली येथे प्रतिनियुक्तीवर कार्यरत असलेल्या श्रीमती सविता शि कटारे (शालगर) यांच्या संदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) तदनुसार, महाराष्ट्र नागरी सेवा वर्तणूक नियम १९७९ मधील कलम (४) तरतुदीनुसार भ्रष्ट अधिकारी म्हणून श्रीमती सविता शि.कटारे (शालगर) यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (२१-०२-२०२२) :** (१) होय.

(२), (३) व (४) श्रीमती सविता शि. कटारे (शालगर), कार्यकारी अभियंता ह्या कार्यकारी अभियंता, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना कार्यालय, हिंगोली येथे कार्यरत असताना, त्यांचेविरूद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, हिंगोली यांनी दि.१६.०९.२०२० रोजी लाचेच्या सापळा कारवाई करून भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७ व १२ अन्वये पो.स्टे. हिंगोली शहर येथे गुरनं-४४०/२०२० गुन्हा दाखल आहे व त्यांना दिनांक १७.०९.२०२० रोजी वेळ १०.०५ वाजता अटक केली होती. मा.विशेष न्यायालय, परभणी यांनी एक दिवसाची पोलीस कोठडी मंजुर करून श्रीमती सविता शि. कटारे (शालगर), कार्यकारी अभियंता यांची दिनांक १८.०९.२०२० रोजी जामीनावर मुक्तता केली आहे.

त्यामुळे, त्यांची कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र ग्रामिण रस्ते विकास संस्था, जालना या रिक्त पदावर दिनांक ०४.०८.२०२१ च्या आदेशान्वये बदली करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## आदिवासींसाठी राखीव असलेली पदभरती राबविण्याबाबत

**(३१) ३३७६४ (११-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा. ना. श्री. छगन भुजबळ मंत्री अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील गठीत अभ्यास गटाकडून अद्यापही शासनाकडे शिफारसी अप्राप्त असल्यामुळे आदिवासींसाठी राखीव असलेली १२५०० पदे भरण्यासाठी विशेष भरती मोहीम राबविण्याबाबत स्थनिक लोकप्रतिनिधी यांनी मा. अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना दिनांक ६ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कार्यवाही झाली नसल्यास, होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (१८-०२-२०२२) :** (१) होय

(२) सामान्य प्रशासन विभागाच्या दि.२१.१२.२०१९ च्या शासन निर्णयानुसार अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र अवैध ठरलेल्या कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर वर्ग केल्यानंतर अनुसूचित जमातीची रिक्त झालेली पदे भरण्यासाठी भरती प्रक्रिया तात्काळ राबविण्याच्या सूचना सर्व विभागांना मुख्य सचिव यांच्या दि.२४.१२.२०२१ च्या अ.शा. पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार भरतीप्रक्रिया सुरु झालेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सार्वजनिक बांधकाम खात्यात अभियंत्यांच्या बदल्यांचा घोळ झाल्याबाबत**

**(३२) ३३८२२ (११-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम खात्यात अभियंत्यांच्या बदल्यांचा घोळ झाल्याबाबतची बाब माहे ऑगस्ट, २०२० मध्ये उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभागात बदली झालेल्यामध्ये ५ मुख्य अभियंता, १५ अधीक्षक अभियंता तर ५० कार्यकारी अभियंताचा समावेश असून त्यापैकी काही अभियंते पात्र नसतांनाही त्याची बदली नियमांना डावलून करण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सार्वजनिक बांधकाम खात्यातील पात्र अभियंताना डावलून अपात्र अभियंताच्या बदलीचे आदेश काढणाऱ्या समितीच्या कामाची चौकशी करून घोळ झालेल्या बदलीच्या आदेशाला स्थगिती देण्यात आलेली आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. अशोकराव चव्हाण (१५-०२-२०२२) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

सार्वजनिक बांधकाम विभागातील सन २०२० च्या सर्वसाधारण बदल्या ह्या जुलै व ऑगस्ट या महिन्यात करण्यात आलेल्या आहेत. सदरच्या बदल्या ह्या महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ व सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. ७.७.२०२० व दि. २३.७.२०२० नुसार करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्य शासकिय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर पुन्हा सल्लागार, कंत्राटी, सेवेत वाढ, इत्यादि पध्दतीने पुनर्नियुक्त अधिकारी/ कर्मचा-यांना किमान वेतन देण्याबाबत**

**(३३) ३३८७८ (११-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :**सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासकिय सेवेतून निवृत्त झाल्यानंतर पुन्हा सल्लागार, कंत्राटी, सेवेत वाढ, इत्यादि पध्दतीने पुनर्नियुक्त अधिकारी/ कर्मचा-यांना किमान वेतन देण्याचा व संपूर्ण कंत्राट काळात कोणतीही वाढ, आर्थिक व इतर सवलती न देण्याचा शासनाचा विचार चालू आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर केव्हा निर्णय घेण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी

घेण्याबाबतचा निर्णय शासनाने दि. १७.१२.२०१६ व दि. २१.०२.२०१८ रोजी घेतला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना सेवा करार पध्दतीने घेतल्यानंतर त्यांना द्यावायाच्या मासिक पारिश्रमिक व अनुषंगिक भत्यांची तरतूद दि. १७.१२.२०१६ च्या शासन निर्णयात परिच्छेद २ (ड) येथे नमूद करण्यात आल्या आहेत. त्यानुसार सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस करार पध्दतीने नियुक्तीच्या वेळीस महागाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्तीवेतनाएवढी रक्कम (अंशराशीकृत निवृत्तीवेतन वगळून) त्यांचे मासिक पारिश्रमिक निश्चित करण्यात येते. सदर पारिश्रमिक त्यांच्या करार पध्दतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी कायम राहते. त्याचप्रमाणे निवास भत्ता, प्रवास भत्ता आणि दूरध्वनी भत्ता या सर्व भत्यापोटी प्रतिमाह मासिक पारिश्रमिकाच्या जास्तीत जास्त २५% इतक्या मर्यादेपर्यंत रक्कम अनुज्ञेय असते.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य सरकारच्या विविध विभागामार्फत रिक्त पदांची भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत**

**(३४) ३३९७४ (११-०१-२०२२). श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य सरकारच्या विविध विभागामार्फत रिक्त पदांची भरतीसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे प्रस्ताव पाठविण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे माहिती पाठविण्याची मुदत सप्टेंबर, २०२१ अखेर होती, हे खरे आहे काय,

(२) असल्याास, या मुदतीत कोणकोणत्या विभागांनी किती रिक्त पदांची माहिती सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केली नाही,

(३) सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त झालेली माहिती तपासून लोकसेवा आयोगाकडे केव्हा पाठविण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२):** (१), (२) व (३) राज्य शासनामधील रिक्त पदे भरण्याबाबत वित्त विभागाने शासन निर्णय दि.३० जुलै, २०२१ अन्यवे दि. ३० सप्टेंबर, २०२१ पर्यंत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्याची कार्यवाही करण्याच्या सूचना सर्व प्रशासकीय विभागांना दिल्या. त्यानुसार संबंधित प्रशासकीय विभाग हे सामान्य प्रशासन विभागामार्फत मागणीपत्र न पाठविता परस्पर आयोगाकडे मागणीपत्र पाठवितात.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अनुकंपा तत्वावरील उमेदवारांच्या प्रतिक्षा यादीबाबत**

**(३५) ३४४०० (११-०१-२०२२). श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील राज्य शासनाच्या विविध विभागांच्या कार्यालयामध्ये मागील १३ वर्षापेक्षा जास्त कालावधीपासुन प्रतिक्षा यादीतील १६ हजार उमेदवार तथा जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० हजार प्रतिक्षा यादितील उमेदवार नियुक्ती करीता प्रतिक्षाधिन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रतिक्षाधिन उमेदवारांना नोकरीमध्ये सामावून घेण्याबाबत काय कार्यवाही करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही,

अनुकंपा नियुक्तीसाठी सप्टेंबर, २०२१ अखेरीस १०,१६७ उमेदवार राज्य शासनाच्या प्रतिक्षासूचीवर आहेत. तसेच जिल्हा परिषदांकडील अनुकंपा नियुक्त्याच्या प्रतिक्षासूचीवर ६,०२३ इतके उमेदवार आहेत.

(२) प्रतिक्षाधीन उमेदवारांना जलदगतीने अनुकंपा नियुक्ती मिळावी यास्तव खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात आली आहे.

अ) अनुकंपा नियुक्त्या तातडीने होण्याच्या अनुषंगाने यासंबंधीच्या कार्यपध्दतीमध्ये असणारा संभ्रम दूर करुन अनुकंपा नियुक्ती प्रक्रिया जलद गतीने पूर्ण करण्यास सहाय्यभूत होण्यासाठी दि.२६.०८.२०२१ च्या परिपत्रकान्वये अनुकंपा नियुक्तीची प्रमाणित कार्यपध्दती (SOP) प्रसिध्द करण्यात आली आहे.

ब) त्यानंतर विविध विभागांमधील अनुकंपा नियुक्तीचा आढावा घेण्यात आला असता गट-क च्या २,५५५ व गट-ड च्या १,०६७ अशा एकूण ३,६२२ उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती देण्यात आली आहे.

क) अनुकंपा नियुक्तीद्वारे भरावयाच्या पदांची टक्केवारी पूर्वीप्रमाणेच १० टक्के न ठेवता दि.३१.१२.२०२४ पर्यंत तीन वर्षासाठी २० टक्के ठेवण्याबाबत दि.२२.१२.२०२१ रोजी आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे - पानशेत रस्त्यावर पानशेत धरण परिसरात संरक्षक भिंती व कठडे उभारण्यात न आल्यामुळे होणरे वाहन अपघाताबाबत**

**(३६) ३४४५७ (११-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील पुणे-पानशेत रस्त्याचे सुमारे सव्वादोनशे कोटी रुपये खर्च करुन रुंदीकरण करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यावरील पानशेत व खडकवासला धरणांच्या तिरावरील पानशेत रस्त्याचा बहुतेक भाग धोकादायक असून सदर रस्त्याच्या रुंदीकरणाचे कामामध्ये रस्त्यालगत संरक्षक भिंती व कठडे उभारण्यात न आल्यामुळे तेथील कुरण (खुर्द) गावांजवळून पुण्याकडे जाणाऱ्या मोटारीचा वाहन अपघात होऊन त्यामध्ये ४ जणांचा मृत्यु झाल्याची दुर्दैवी घटना दि. २ ऑक्टोबर, २०२१ रोजी घडली असल्याचे आढळून आले आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्यावर मोठया प्रमाणात वाहनांची ये-जा असल्याने या रस्त्यावर अनेकदा वाहन अपघात होऊन त्यामध्ये शेकडो नागरीकांचे मृत्यु होत असल्याच्या घटना वारंवार घडत असल्याचेही वेळोवेळी निदर्शनास येत आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, वेल्हा पोलिसांनी त्याप्रकरणी दाखल केलेल्या गुन्हयाबाबत पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) तसेच पानशेत धरणाच्या पर्यटन व प्रेक्षणिय स्थळांवरील धोकादायक ठिकाणी वरील रस्त्यावर संबंधित कंत्राटदाराने संरक्षक भिंती व कठडे न उभारण्याची कारणे काय व त्याबाबत संबंधित ठेकेदारांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. अशोक चव्हाण (२७-०१-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे.

पुणे जिल्हयातील पुणे ते पानशेत रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम हायब्रीड ॲन्युइटी अंतर्गत चालू असून या रस्त्याची किंमत रु.४२.१६ कोटी इतकी आहे.

(२) अंशत: खरे आहे.

प्रस्तुत रस्त्याचे रुंदीकरणाचे काम पुर्ण झाले असून आवश्यक ठिकाणी संरक्षक कठडे उभारण्यात आले आहेत. तसेच सदर रस्त्यावर कुरण खुर्द गावाजवळ झालेला अपघात हा वाहनाचा वेग जास्त असल्याने व वाहकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्यामुळे झालेला आहे, असे वेल्हा पोलिस स्टेशन यांच्या FIR मध्ये नमुद केलेले आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रस्तुत रस्त्याचे रुंदीकरणाचे काम पुर्ण झाले असून आवश्यक ठिकाणी संरक्षक कठडे उभारण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बोपदेव घाटातील (जि.पुणे) रस्त्यावरील सीमा भिंतीचे काम**
**निधी मंजूर असूनही न करण्यात आल्याबाबत**

**(३७) ३४४७२ (११-०१-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी), श्री.अशोक पवार (शिरुर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढवा-सासवड रस्त्यावरील बोपदेव घाटातील सीमा भिंत दुरुस्तीसाठी शासनाने रुपये ७५ लाखांचा निधी मंजूर केलेला असतानाही रस्त्याच्या सीमा भिंतीच्या दुरुस्तीचे काम अद्याप सुरु करण्यात आले नसल्याचे दि. १२ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रस्त्यावरील सीमा भिंतीचे काम सुरु न केल्यामुळे आतापर्यंत ५ जणांचा त्याठिकाणी मृत्यु झाल्याच्या दुर्दैवी घटना घडल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये आढळून आले आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रस्त्यावरील सीमा भिंतीचे काम सुरु करण्याबाबत वारंवार पाठपुरावा करुनही कार्यवाही न झाल्यामुळे पुन्हा दि. ११ ऑक्टोबर, २०२१ रोजी मा.कार्यकारी अभियंता तसेच मा.अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम, पुणे तसेच मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री व मा.राज्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले आहेत, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागरीकांचे भविष्यात जाणारे बळी वाचविण्याचे दृष्टीने त्याप्रकरणी शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. अशोक चव्हाण (२३-०२-२०२२) :** (१),(२), (३) व (४) हे खरे नाही.
सदर ठिकाणी संरक्षक भिंत बांधकाम करण्याचे मंजुर काम माहे ऑक्टोबर २०२१ मध्ये पुर्ण करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण व मुरबाड येथून शहापूर शहराजवळील मुंबई-नाशिक महामार्गाला किन्हवलीमार्गे जोडणारा संगमेश्वर येथील पूल धोकादायक असण्याबाबत**

**(३८) ३४५०२ (११-०१-२०२२). श्री.दौलत दरोडा (शहापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शहापूर व मुरबाड (जि.ठाणे) या तालुक्यांना जोडणारा तसेच कल्याण व मुरबाड येथून शहापूर शहराजवळील मुंबई-नाशिक महामार्गाला किन्हवलीमार्गे जोडणारा वर्दळीचा संगमेश्वर येथील पूल गेल्या २० वर्षापासून देखभाल दुरुस्ती अभावी धोकादायक अवस्थेत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पूलाची तातडीने दुरुस्ती करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आली आहे,
(३) असल्यास, याकरिता निधीची तरतूद करण्यात आली आहे काय,
(४) अद्याप, निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (२७-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही. कल्याण व मुरबाड येथून शहापूर शहराजवळील मुंबई नाशिक महामार्गाला किन्हवली मार्गे जोडणारा संगमेश्वर येथील पूल दगडी आर्च टाईपचा आहे. या पुलावर डांबरी धावपट्टीची रुंदी ७.०० मीटर असल्यामुळे दोन्ही बाजूने वाहने एकाच वेळी जाणे शक्य होते. सद्यस्थितीत सदर पुल हा वाहतुकीस योग्य असल्याने पुनर्बांधनीसाठी विचाराधीन नाही
(२) व (३) सदर पुलाची दुरुस्ती व देखभाल ही हायब्रीड ॲन्युटी अंतर्गत करण्यात येत असून सदर कामाकरिता निधीची तरतुद करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील अवैध वृक्ष तोडीबाबत**

**(३९) ३४५१४ (११-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गेल्या चार वर्षापासून सुमारे दोन लाख त्रेसष्ट हजार झाडाची अवैध्यरित्या वृक्षतोड झाल्याचे सामाजिक कार्यकर्त्याने मिळवलेल्या माहितीच्या अधिकारातून दि. १८ ऑक्टोबर २०२० रोजी हि बाब निदर्शनास आली आहे हे खरे आहे का,

(२) सदरची माहिती अधिकृत रित्या वन विभागाकडून सागण्यात आली आहे, हे खरे आहे का,

(३) असल्यास, संबधीत विभाग अवैध वृक्ष तोड अपयशी ठरले आहे. हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करण्यात येणार आहे का व चौकशी मर्यादित कालावधीमध्ये करण्यात येणार आहे का,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) व (२) होय,

(३) व (४) राज्याचा संपूर्ण विस्तार व त्यातील पसरलेल्या वनक्षेत्राचा कठिण भाग विचारात घेता विभाग अपयशी ठरला नसून गेल्या चार वर्षात सन २०१८ ते सन २०२१ (जानेवारी ते जून २०२१) पर्यंत साग व इतर वृक्षांची एकूण २,६३,३२२ एवढी अवैध वृक्षतोड झालेले निदर्शनास आल्याने, याबाबत वन विभागाने १०३१२.६२३ घन मिटर माल हस्तगत करुन रु.२१४०.३४ लाखाची वसूली करण्यात आली आहे. चोरटया तोडीमुळे होणाऱ्या नुकसानीवर सतत लक्ष ठेवण्यात येत असून घडणाऱ्या प्रत्येक घटनांची दखल घेण्यात येते व त्याची विनाविलंब सविस्तर चौकशी करण्यात येते, चौकशी दरम्यान मुद्देमाल जप्त करणेसह वन विभागाच्या नियमानुसार फौजदारी कार्यवाही करण्यात येते. कोणत्याही विशिष्ट प्रकरणात वनकर्मचाऱ्यांकडुन निष्काळजीपणा अथवा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहभाग आढळण्यास संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी केली जाते व दोषी आढळल्यास नियमानुसार दंडनीय कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**(ता.जत, जि.सांगली) कुंभारी, जत, बिरनाळ, रावळगुंडवाडी व मुचंडी या गावातील शेतक-यांना संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला न मिळाल्याबाबत**

**(४०) ३४५२१ (११-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ E नागज-मुचंडी दुपदरीकरणासाठी (ता.जत, जि.सांगली) कुंभारी, जत, बिरनाळ,रावळगुंडवाडी व मुचंडी या गावातील भूसंपादन प्रक्रीया सुरु असून त्याबातचे निवाडे दि.७ एप्रिल,२०२१ चा सादर प्रस्ताव दि. ८ जुलै, २०२१ ला त्रुटी पूर्ततेनंतर फेरप्रस्ताव सादर १५ सप्टेंबर, २०२१ रोजी त्रुटीकाढून परत हे सर्व मा.सचिव राष्ट्रीय महामार्ग (सा.बां.) कोकण भवन, मुंबई यांचे कडून तिन वेळा त्याच त्याच त्रुटी काढून प्रस्ताव परत पाठविण्यात आला हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संपादित जमिनी अधिग्रहित होऊन २ ते ५ वर्षे झाली तरी बांधित शेतक-यांना अदयाप मोबदला मिळेला नाही हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने तातडीने याबाबत आढावा घेऊन बांधित शेतक-यांना लवकरात लवकर मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अशोक चव्हाण (१८-०२-२०२२) :** (१) अंशत:खरे आहे.
सदर प्रस्तावावर तीन वेळा त्याच त्याच त्रुटी काढून प्रस्ताव परत करण्यात आला नसून दोन्ही वेळा निरनिराळया त्रुटींच्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव परत पाठविणेत आला.
(२) हे खरे नाही.
संपादीत जमिनी अधिग्रहित करण्यात आलेल्या नाहीत. तथापि सद्यस्थितीत भूसंपादन प्रक्रिया प्रगतीत असून सदर प्रक्रिया पूर्ण होताच मोबदला देण्यात येणार आहे.
(३) मा.विभागीय आयुक्त, पुणे व मा.जिल्हाधिकारी, सांगली यांच्याकडून भूसंपादनाबाबत वेळोवेळी आढावा बैठका घेणेत आल्या असून भूसंपादन प्रक्रिया अंतिम स्तरावर आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत व त्यांच्यासाठीच्या योजनांच्या अंमलबजावणीबाबत**

**(४१) ३४७१७ (१७-०१-२०२२). श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मराठा आरक्षणाचा कायदा मा.सर्वोच्च न्यायालयात टिकवण्यामध्ये अपयश आल्यानंतर आता मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा अभ्यास करून आरक्षण टिकवण्याच्या संदर्भातील त्रुटी दूर करून पुन्हा आरक्षण मिळण्याच्या दृष्टीने करावयाच्या कार्यवाही बाबतही राज्य शासनाकडून दिरंगाई व वेळकाढूपणा केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठा समाजासाठी जिल्हास्तरावर वसतिगृहे उघडणे, समाजातील तरुणांना शैक्षणिक कर्ज सुविधा उपलब्ध करून देणे, सारथी संस्थेची कार्यालये प्रत्येक महसुली विभागात सुरू करणे, अण्णासाहेब पाटील महामंडळाला भरघोस निधी उपलब्ध करून देणे इत्यादी तत्कालीन सरकारच्या निर्णयांना अधिक व्यापकपणे पुढे नेण्यासाठी शासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी तसेच त्यांच्यासाठीच्या विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. उद्धव ठाकरे (१०-०२-२०२२) :** (१), (२) व (३) मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.५ मे, २०२१ रोजी सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास वर्ग (एसईबीसी) आरक्षण अधिनियम, २०१८ अवैध ठरविल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या दि.५ मे, २०२१ च्या निर्णयाची समीक्षा करण्यासाठी दि.११ मे, २०२१ च्या शासन निर्णयान्वये माजी मुख्य न्यायाधीश, अलाहाबाद उच्च न्यायालय,

मा.न्या.दिलीप भोसले यांच्या अध्यक्षतेखाली समीक्षा समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीच्या शिफारशीनुसार राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात पुनर्विलांकन याचिका दाखल केलेली असून सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. तसेच, महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी दि.५ जुलै, २०२१ रोजी राज्यात मराठा समाजाला आरक्षण देण्याकरीता ५०% आरक्षण मर्यादेचा अडसर दूर करण्यासाठी मा.न्यायालयांच्या न्यायनिर्णयांमध्ये निश्चित केलेली आरक्षणाची ५०% इतकी मर्यादा शिथिल करुन केंद्र सरकारने मराठा समाजाला आरक्षण देण्याकरीता भारताच्या संविधानात यथोचित सुधारणा कराव्यात अशी शिफारस केंद्र सरकारला करणारा ठराव पारित केला असून तो दि.१४.१०.२०२१ रोजी केंद्र शासनास पाठवला आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाने दि.१३.७.२०१८ अन्वये राज्यात डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना" या योजनेखाली नोंदणीकृत संस्थांना वसतीगृह चालविण्यासाठी शासकीय व इतर इमारती भाडयाने देणे अशा स्वरुपाची योजना सुरु केली आहे. याअंतर्गत १३ जिल्हयामधील वसतीगृहे उभारण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून मुंबई, मुंबई उपनगर, पुणे, सातारा (कराड), सांगली (मिरज), कोल्हापूर, नाशिक (२ वसतीगृहे), औरंगाबाद (२ वसतीगृहे), बीड, लातूर, अमरावती व नागपूर या १४ ठिकाणी वसतीगृहाकरीता संस्था व इमारती अंतिम झाल्या आहेत. या वसतीगृहामध्ये २२३४ मुले व १४५५ मुली अशी एकूण ३६८९ इतकी प्रवेश क्षमता आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता "डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना" राबविण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून या योजनेअंतर्गत कुटुंबाची उत्पन्न मर्यादा रु.८.०० लाख केली असून शहरी भागातील लाभार्थ्यांना (मुंबई व पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इ.) प्रतिवर्ष रु.१०,०००/- इतर शहरे ग्रामीण भागासाठी रु.८,००० निर्वाह भत्ता देण्यात येतो. ही योजना खुल्या व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना लागू असून यामध्ये मराठा समाजातील विद्यार्थ्यांचा अंतर्भाव होतो. सन २०१९-२० मध्ये ८४८४ विद्यार्थ्यांना रु.१७.२५ कोटी इतकी रक्कम व सन २०२०-२१ मध्ये १०११ विद्यार्थ्यांना रु.२.४३ कोटी इतकी रक्कम निर्वाह भत्यापोटी देण्यात आलेली आहे.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातर्फे मराठा समाजातील मुला-मुलींना उद्योग व्यवसायासाठी वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा योजना राबविण्यात येत आहे. महामंडळास रु.१८२५ कोटी इतक्या निधीचे वाटप सन २०१८ पासून झालेले असून महामंडळास आवश्यकतेनुसार आणखी निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. आतापर्यंत २७९२४ लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेतला असून रु.१३४.२६ कोटी रुपयांची प्रतिपूर्ती करण्यात आलेली आहे. तसेच, महामंडळामार्फत सद्य:स्थितीत सुरु असलेली व्याज परताव्याची योजना, केंद्र व राज्य शासनाच्या तत्सम योजना व महामंडळाची जिल्हा यंत्रणा यांचा एकत्रित अभ्यास करुन मराठा समाजाच्या मुला-मुलींना थेट कर्ज योजनेबाबत महामंडळाच्या संचालक मंडळामार्फत मेमोरॅण्डम ऑफ असोसिएशन मधील तरतुदीप्रमाणे उचित निर्णय घेण्यात येणार आहे.

सारथीमार्फत छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती-२०१९ या योजनांद्वारे विद्यार्थ्यांना फेलोशिप देण्याचे धोरण आखण्यात आलेले आहे. तसेच, यूपीएससी व

एमपीएससी अशा स्पर्धात्मक परीक्षेसाठी गुणवंत व पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षणाकरिता तसेच आकस्मिक खर्चाकरीता विद्यावेतन व टेस्ट सिरीज साठी आर्थिक सहाय्य, कोचिंग संस्थेचे शुल्क दिले जाते.

सारथी संस्थेची विभागीय कार्यालये पुणे, कोल्हापूर, नाशिक, अमरावती, नागपूर, औरंगाबाद व लातूर या ठिकाणी सुरु करण्यात येत असून त्यासाठी जमीन उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु आहे. सारथा संस्थेने पुणे शहर, पेठ पर्वती येथील न.भू.क्र.२३० मधील ५१३३.८ चौ.मी. ३००० चौ.मी. जमीन संस्थेस विनामूल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव दि.१७.११.२०२१ रोजी मा.जिल्हाधिकारी, पुणे यांना सादर केला आहे.

सारथी संस्थेचे उपकेंद्र कोल्हापूर येथे राजाराम महाविद्यालयाच्या इमारतीमध्ये दि.२६.६.२०२१ पासून कार्यान्वित झाले आहे. कोल्हापूर शहर येथील रि.स.नं. ३७४, ३७५, ३७६, ३७७ व ३७८ मधील २.०० हेक्टर जमीन सारथी संस्थेस विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांनी दि.२०.८.२०२१ रोजी महसूल विभागास सादर केलेला आहे.

मौजे नाशिक ता.जि. नाशिक गट क्र.१०५६/१०५७/१ मधील ०.६० हे.आर (६००० चौ.मी.) जमीन सारथी संस्थेस विनामूल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दि.१५.७.२०२१ रोजी महसूल विभागास सादर केलेला आहे.

औरंगाबाद शहर गारखेडा येथील सि.स.नं. १५३०९ मधील १.२४ हेक्टर जमीन सारथी संस्थेस विनामूल्य उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दि.३०.७.२०२१ रोजी महसूल विभागास सादर केलेला आहे.

नागपूर शहर सीताबर्डी येथील नगर भूमापन क्र.१८४६ मधील ९२९६.०० चौ.मी. जमीन सारथी संस्थेस विनामूल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नागपूर यांनी ि२४.९.२०२१ रोजी महसूल विभागास सादर केलेला आहे.

लातूर शहर वरवंटी गाव येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था मुलींचे वसतीगृह गट क्र.व उपविभाग १११ (१६) क्षेत्र ६.०७ हे.आर. पैकी २.०० हे.आर. जमीन सारथी संस्थेस विनामूल्य उपलब्ध करुन देणेबाबतचा प्रस्ताव दि.१७.११.२०२१ रोजी मा.जिल्हाधिकारी, लातूर यांना सादर केलेला आहे.

विदर्भ ज्ञान महाविद्यालय अमरावती येथील २ हेक्टर जमीन सारथी संस्थेस उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी व मा.ना. यशोमतीताई ठाकूर यांच्यासमवेत दि.२३.७.२०२१ रोजी चर्चा झाली. सदर जमिनीच्या प्रस्तावासंदर्भात जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

सिडको महामंडळ यांच्याकडे विभागीय कार्यालयास जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अंबरनाथ व कल्याण (जि.ठाणे येथील हाजीमलंग गडावरील फयुनिक्युलर रेल्वे प्रकल्पाबाबत**

**(४२) ३४८९५ (१७-०१-२०२२). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ व कल्याण (जि.ठाणे) तालुक्यांच्या मध्य भागातील हाजी मलंग गडावरील फयुनिक्युलर रेल्वे (डोंगरावरील रेल्वे) प्रकल्पास सन २०१२ मध्ये मान्यता देऊनही हा प्रकल्प अद्यापपर्यंत पूर्ण झालेला नाही. हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकल्पाचे काम डिसेंबर पर्यंत पूर्ण करण्याचे आदेश पालक मंत्री यांनी दिले आहे हे खरे आहे काय,

(३) या प्रकल्पाचे काम मुदतीत पूर्ण न झाल्यास कंत्राटदाराला काळया यादीत टाकण्याचे आदेशही सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांना दिले आहे हे खरे आहे का,

(४) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोक चव्हाण (२२-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मा. पालकमंत्री यांनी सदरचे काम डिसेंबर, २०२१ अखेर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) संबंधित उद्योजकावर सवलत करारनाम्यातील तरतुदी नुसार करारनामा संपुष्टात आणण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

---

**उपनिरीक्षक पदासाठीच्या शारीरिक चाचणीसाठी विदर्भ व मराठवाड्यात एकही केंद्र उपलब्ध नसल्याबाबत**

**(४३) ३४९७५ (१७-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एम.पी.एस.सी) ४४६ उपनिरीक्षक पदासाठीच्या शारीरिक चाचणीसाठी राज्यात नाशिक, पुणे, कोल्हापूर अशी ३ केंद्रे जाहीर करण्यात आली असून विदर्भ आणि मराठवाड्यात एकही केंद्रे जाहीर करण्यात आले नसल्याने येथील उमेदवारांत अन्यायाची भावना पसरलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून उपनिरीक्षक पदाच्या शारीरिक चाचणीसाठी विदर्भ आणि मराठवाड्यात केंद्र जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विदर्भ आणि मराठवाड्यात केंद्रे जाहीर नाकारण्यामागची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) पोलीस उपनिरीक्षक या संवर्गाच्या ४९६ पदांसाठी एकूण २०८७ उमेदवार पात्र ठरले असल्याने प्रथम टप्प्यात नाशिक, पूणे व कोल्हापूर या केंद्रांवर शारीरिक चाचणी व मुलाखती घेण्यात येणार आहे. आयोगातील इतर परीक्षा व मुलाखतीच्या वेळापत्रकाचा विचार करुन नंतरच्या टप्प्यावर औरंगाबाद, अमरावती व मुंबई केंद्रावर शारीरिक चाचणी परिक्षा कार्यक्रम निश्चित करण्यात येणार आहे.

---

**सोलापूर - पुणे महामार्गावर विशेषत: मोहोळ मोडनिंब दरम्यान रहदारीस रस्ते नादुरुस्तीमुळे अपघातचे प्रमाण वाढल्याबाबत**

**(४४) ३५०१४ (१७-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर - पुणे महामार्गावर विशेषत: मोहोळ मोडनिंब दरम्यान रहदारीस रस्ते नादुरुस्त झाल्याने अपघातचे प्रमाण वाढल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली असल्यास काय निष्पन्न झाले, तद्नुसार सोलापूर - पुणे महामार्गाच्या दुरुस्तीकरिता शासनाने निधीची तरतूद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, प्रस्तुत प्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अशोकराव चव्हाण (१८-०२-२०२२) :** (१) सोलापूर ते पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ वरील मोहोळ ते मोडनिंब चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अखत्यारीत आहे.

सोलापूर ते पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ च्या १०१.३० कि.मी.रस्त्याचे चौपदरीकरण फेब्रुवारी २०१६ मध्ये पूर्ण झाले आहे. सदर काम Design - Build - Finance - Operate - Transfer (DBFOT Basis) या तत्वावरील असल्याने उद्योजकाने १९ वर्ष २९५ दिवसांकरिता सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्ती करावयाची आहे.

त्यानुसार उद्योजकाकडून मोहोळ ते मोडनिंब दरम्यान दुरुस्ती व देखभालीचे काम युध्द पातळीवर करण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदर रस्ता पूर्ववत करण्यात येऊन रस्त्यावरील वाहतूक सुरळीत चालू आहे. तसेच सदर रस्त्यावर माहे ऑगस्ट ते नोव्हेंबर २०२१ या कालावधीत अपघाताची किमान संख्या नोंदवली गेली आहे, असे प्रकल्प संचालक,भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण,सोलापूर यांनी कळविले आहे.

(२) सदर प्रकल्पाचे काम Design - Build - Finance - Operate - Transfer (DBFOT Basis) या तत्वावरील असल्यामुळे उद्योजकाने देखभाल व दुरुस्ती करावयाची आहे. त्यामुळे सदर रस्ता दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधीची तरतूद करण्याचा प्रश्न उद्भवत नाही, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बहिरवली (ता. खेड) (जि.रत्नागिरी) ते करंबवणे (ता. चिपळूण) दाभोळ खाडीतील मंजूर पुलाच्या कामाबाबत खासगी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करणेबाबत**

**(४५) ३५०२२ (१७-०१-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : दिनांक १५ डिसेंबर, २०२० रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ३९ मधील प्रश्न क्रमांक १५३२० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील खेड तालुक्यातील चिंचघर-कोरेगाव-मुंबके-बहिरवली-भडवळे मार्गावर दाभोळ खाडीवर बहिरवली (ता. खेड) ते करंबवणे (ता. चिपळूण) यादरम्यान मोठया पुलाच्या बांधकामास अर्थसंकल्पीय कामे सन २०१७-२०१८ अंतर्गत शासनाने मंजुरी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलाच्या जोडरस्त्यासाठी भूसंपादन करण्यासाठी केंद्र शासन व मा. सर्वोच्च न्यायालयाची परवानगी घेणे आवश्यक असल्याने या परवानग्या प्राप्त करण्यासाठी खासगी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याची कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खासगी तज्ञ सल्लागाराची नेमणूक होऊन सदर आवश्यक परवानग्या प्राप्त झाल्या आहेत काय,
(४) अदयाप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय, आणि विलंब करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे?

**श्री. अशोकराव चव्हाण (१०-०२-२०२२) :** (१) होय,
सदर कामास प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.
(२) होय
(३) खासगी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत असून निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर सल्लागाराची नेमणूक करुन, आवश्यक त्या सर्व परवानग्या प्राप्त करुन घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मंत्रालयीन संवर्गातील पदोन्नतीबाबत**

**(४६) ३५१५१ (११-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंत्रालय अधिकारी संघटनेने शासनास मंत्रालयीन संवर्गातील पदोन्नतीबाबत व संवर्गाबाहेरील उप सचिवांच्या नियुक्तीबाबत निवेदन दिले आहे, हे खरे आहे का, राज्य शासनाच्या विविध विभागांमार्फत उपसचिव/सहसचिव दर्जाची पदे उपसचिव/सहसचिव संवर्गात समाविष्ठ करून भरण्याबाबत प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे प्राप्त होवून सहा महिन्याचा कालावधी उलटला असल्याची बाब निदर्शनास आली आहे खरे आहे का,
(२) मंत्रालयीन उपसचिव/सहसचिव हे पद प्रतिनियुक्तीचे पद नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मंत्रालयीन संवर्गातील उपसचिव/सहसचिव पदावर संवर्गबाहय राज्यसेवेतील इतर संवर्गातील अधिका-यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर नियुक्त्या कोणत्या नियमांच्या आधारे करण्यात आल्या असून नियमबाह्य कार्यवाहीस जबाबदार अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नियमबाहय कार्यवाहीस जबाबदार अधिक-यांवर शासन काय कारवाई करणार आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. उद्धव ठाकरे (०९-०२-२०२२) :** (१) होय.
(२) नाही.

(३) सह सचिव व उप सचिव यांच्या सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार सदर पदावर इतर संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.
(४) उप सचिवांचे सेवाप्रवेश नियम दि.१४.९.१९९२ व सह सचिव पदाचे सेवाप्रवेश नियम दि.४.५.२०१६ मधील तरतुदीनुसार सदर नियुक्त्या करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**गडचिरोली जिल्हयातील तेंदुपत्ता कंत्राटदारांकडुन २०१८ ते २०२० पर्यंतची जीएसटीची रक्कम वसुल करण्याबाबत**

**(४७) ३५१६६ (११-०१-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्हयात तेंदुपत्ता हंगामात ग्रामसभांशी करारनामे करताच कंत्राटदारांनी नियामानुसार १८ टक्के जीएसटीची रक्कम शासनाकडे जमा करण्याची तरतुद आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गडचिरोली जिल्हयात तेंदुपत्ता कंत्राटदारांनी सन २०१८ ते २०२० पर्यंत जीएसटी ची रक्कम भरलेली नसल्याची गंभीर बाब माहे ऑक्टोंबर, २०२१ च्या दुसऱ्या आठवडयात निदर्शनास आलेली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाचा कोटयावधी रुपयाचा महसुल बुडविणाऱ्या तेंदुपत्ता कंत्राटदारांकडुन जीएसटीची रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे वा करण्यात येत आहे काय,
(४) असल्यास, कार्यवाहीचा तपशिल काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्री. उद्धव ठाकरे (२१-०१-२०२२) :** (१) तेंदूपत्ता हे Central Excise Tariff Act,१९८५ अन्वये Chapter Heading १४०४९०१० अंतर्गत येतो. वस्तु व सेवा कर अधिनियम, २०१७ हा दिनांक ०१.०७.२०१७ पासुन अंमलात आलेला आहे. तेंदूपत्ता GST अंतर्गत करपात्र वस्तु असून त्याच्या विक्रीवर कायद्याने परिशिष्ट-३ अन्वये नोंद क्र.४ नुसार Bidi wrapper leaves (tendu) यामध्ये मोडत असून यावर ९% CGST + ९% SGST =१८% इतका GST कर लागतो. तथापि, वनहक्क कायदा २००६ तसेच पेसा कायदा अंतर्गत तेंदू पानांची विक्री व विल्हेवाट संबंधात ग्रामसभाद्वारे करारनामे करण्यात येत असून, ग्रामसभा/ग्रामपंचायत संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नियंत्रणाखाली आहेत. याबाबत शासनाचे अनुक्रमे आदिवासी विभाग तसेच ग्रामविकास विभाग मध्यवर्ती यंत्रणा आहे.

महाराष्ट्र गौण वनोत्पादन (व्यापाराचे विनियम) अधिनियम १९६९ अंतर्गत वनविभागाद्वारे करारनामे करण्यात येत असून तेंदूपाने विक्री संबंधा १८% GST वसुल करण्यात येतो.

(२) महसूल व वनविभाग, शासन पत्र क्रमांक संकीर्ण-२०२१ प्र.क्र.८९/फ-९, दिनांक ०३.०६.२०१२ अन्वये प्राप्त वकील श्री.कबीर एस.कालीदास, नागपूर यांचेमार्फत प्राप्त नोटीसचे अनुषंगाने ही बाब निदर्शनास आली. सदरील नोटीस चे उत्तर पत्र दिनांक ०९.०८.२०२१ अन्वये शासनास सादर केले आहे. सदर पत्रानुसार शासन पत्र क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.८९/फ-९, दिनांक १६.०९.२०२१ अन्वये तेंदू पत्ता संदर्भात नोटीसचे उत्तर ॲड.श्री.कबीर एस कालीदास, नागपूर यांना दिलेले आहे.

(३) व (४) पेसा पर्याय-१ अंतर्गत तेंदूपाने संकलन विक्री व व्यवस्थापन हे वनविभागाचे मार्फत होत असते, त्यामुळे तेंदू घटकातून मिळणारा रॉयल्टी वनविभागाकडे जमा होतो. त्यानंतर GST व इतर कराचा वेळीच संबंधीत विभागाकडे भरणा केल्या जातो. तसेच वनहक्क पेसा पर्याय-२ अंतर्गत तेंदूपाने संकलन, विक्री व विल्हेवाट इत्यादीचे अधिकार ग्रामसभेकडे आहेत. त्यानुसार तेंदूपत्ता कंत्राटदार व ग्रामसभा यामध्ये करारनामा होवून महसूल ग्रामसभा यांचेकडे जमा होते. त्यावर GST व इतर कराचा भरणा हया बाबींची अनुषंगीक जबाबदारी ग्रामसभा व कंत्राटदार यांचेवर येते.

सन २०१८ ते २०२० पर्यंत ग्रामसभांनी पर्याय-१ ची निवड केल्याप्रमाणे त्यांचे घटक तयार करुन विक्री करण्यात आली आणि ज्या तेंदू घटकाची विक्री होवून तेंदूपानांचे संकलन झाले अशा सर्व घटकाचे परवानाधारक यांचेकडून GST ची रक्कम वसुल करुन वेळीच संबंधीत विभागाकडे रक्कम वळती करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयातील विविध शासकिय कार्यालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(४८) ३५२५२ (१७-०१-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील विविध शासकिय कार्यालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे नुकतेच माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय, महसूल गोळा करणा-या विभागात ग्रामपंचायतीत, तसेच विविध शासकिय कार्यालयांमध्ये पोलिसांसाठी बसण्याची कोणतीही व्यवस्था नसणे, खुर्च्या आहेत पण खुर्च्यांचे हात मोडलेले असणे, ऑनलाईन कामाचा बागुलबुवा असणे, कॉम्प्युटर अपुरे असणे,शुध्द पाण्याची व्यवस्था नाही, लाईट गेला तर जनरेटरची व्यवस्था नाही, परिसराची स्वच्छता नाही अशा अनेक बाबींच्या तक्रारी आल्या आहेत हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत?

**श्री. अशोक चव्हाण (२१-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२) रत्नागिरी जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल दुरुस्तीसाठी एकूण ४९० शासकीय कार्यालयीन इमारती आहेत. सदर इमारतींची स्थापत्य विषयक दुरुस्ती सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आवश्यकतेनुसार वेळोवेळी करण्यात येते. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासकीय कार्यालयीन इमारती वगळून अन्य शासकीय इमारतींची फर्निचर, परिसर स्वच्छता, संगणक व अनुषंगिक सोयीसुविधा संबंधीत कार्यालयाकडून करण्यात येतात. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयांतील फर्निचर सुस्थितीत असून पुरेसे संगणक, शुध्द पाणी व्यवस्था, जनरेटर यांची व्यवस्था योग्य आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील वन क्षेत्रपालांच्या तदर्थ पदोन्नती नियमित करण्याबाबत**

**(४९) ३५३५४ (१७-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील वनपाल संवर्गातून वनक्षेत्रपाल संवर्गात तदर्थ पदोन्नती दिलेल्या वन क्षेत्रपालांच्या पदोन्नत्या नियमित करण्याबाबत मंत्रालयातील वन खात्याकडे १२ एप्रिल, २०१९ ला प्रस्ताव देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मात्र या प्रस्तावावर सुमारे दोन वर्षात निर्णय होऊ शकलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन या प्रस्तावावर निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (१८-०२-२०२२) :** (१) वनक्षेत्रपाल संवर्गातील तदर्थ पदोन्नती नियमित करण्यासंदर्भात अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन व दुय्यम संवर्ग), नागपूर यांचेकडून दिनांक १६.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.
(२) व (३) दिनांक १६.१२.२०२१ अन्वये प्राप्त झालेल्या सुधारीत प्रस्तावाच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाच्या सहमतीने निर्णय घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मीसाबंदी मधील लोकांना पेन्शन सुरू करण्याबाबत**

**(५०) ३५७२९ (११-०१-२०२२). श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तत्कालीन शासनाच्या काळात मीसाबंदीतील लोकांना तत्कालिन मुख्यमंत्री यांनी मीसाबंदी पेंशन लागू केली होती ती या शासनाने थांबविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त लोकांना शासन परत मीसाबंदी पेन्शन सुरू करणार आहे काय,
(३) असल्यास, सदरहू लोकांना मीसाबंदी पेन्शन सुरु करण्याबाबत शासकनाकडून कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. उद्धव ठाकरे (०८-०२-२०२२) :** (१) व (२) भारतामध्ये दिनांक २५.६.१९७५ ते दिनांक ३१.३.१९७७ या कालावधीत घोषित केलेल्या आणीबाणीच्या कालावधीत ज्या व्यक्तींना कारावास सोसावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्याकरिता शासनाने दिनांक ३ जुलै, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये मानधन योजना राबविली होती. तथापि, सन २०२० मध्ये कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीमध्ये सन २०२०-२१ या वित्तीय वर्षात राज्याची कर व करेतर उत्पन्नातील अपेक्षित महसूली घट व त्याचे राज्याच्या अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम विचारात घेवून दि.३१.७.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना बंद करण्यात आली असून, या योजनेंतर्गत पात्र लाभार्थींना प्रलंबित दायित्वाचे प्रदान करण्यात आले आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :** **राजेन्द्र भागवत**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.